भारतीय रिझर्व बँक
**RESERVE BANK OF INDIA**
**WWW. rbi. org. in**

*आर बी आय /२०११-१२/५८*
*डीबीओडी.क्रमांक.डीआयआर.बीसी. ७ /१३.०३.००/२०११-१२* *जुलै १, २०११*
*आषाढ १०, १९३३ (शक)*

*सर्व शेड्युल्ड कमर्शियल बँका*
*(आरआरबीज् वगळून)*

*महोदय/महोदया,*

*विगोपन दंडक मुख्य परिपत्रक (एक्सपोजर)*

*कृपया आमचे मुख्य परिपत्रक डीबीओडी क्रमांक डीआयार बीसीए १४ /१३.०३.००/२०१०-११ दिनांक १ जुलै २०१० पहावे. त्यामध्ये त्या दिवसापर्यतचे विगोपन दंडकाबाबतच्या सर्वसुचना / मार्गदर्शक तत्वे एकत्रित केली होती. हे मुख्य परिपत्रक ३० जून २०११ पर्यंतच्या सर्व सुचना एकत्रित करुन अद्यतन केले आहे. हे परिपत्रक रिझर्व बँकेच्या संकेत स्थळावर* (www.rbi.org.in).
*उपलब्ध आहे. याची प्रत जोडली आहे.*

*आपला विश्वासु,*

*(पी. आर रवि मोहन)*
*प्रभारी मुख्य महाप्रबंधक*

*संलग्न : वरील प्रमाणे*

*बँकिंग व्यवहार व विकास विभाग, १३वा मजला, एनसीओबी, शहिद भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१, टेलिफोन क्र :९१-२२-२२६ ०१००० / फॅक्स: ९१-२२-२२७ ०१२२४ ईमेल आय डी :* **cgmicdbodco@rbi.org.in**

## अनुक्रमाणिका


| परिच्छेद | विषय |
|---|---|
| अ | उद्देश |
| ब | वर्गीकरण |
| क | पूर्वीच्या सूचना |
| ड | सूचना लागू होणे |
| १ | परिचय |
| २ | मार्गदर्शक तत्वे |
| २.१ | वैयक्तिक कर्जदारांच्या बाबतीत विगोपन |
| २.१.१ | मर्यादा |
| २.१.२ | पुनर्वसन |
| २.१.३ | व्याख्या |
| २.१.४ | आढावा |
| २.२. | उद्योग क्षेत्र किंवा काही विभागाच्या बाबतीत विगोपन |
| २.२.१ | अंतर्गत विगोपन मर्यादा |
| २.२.२ | भाडेपट्टा व्यवसाय, भाडे खरेदी व अडते (फॅक्टरिंग) व्यवसाय यांच्या बाबतीत विगोपन |
| २.२.३ | भारतीय सहकंपन्या/परदेशातील पूर्ण मालकीच्या उपकंपन्या भारतीय कंपन्यांच्या परदेशातील स्टेपडाऊन उपकंपन्या |
| २.३ | बँकेचे भांडवल बाजारा बाबात विगोपन |
| २.३.१ | भांडवल बाजाराचे भाग |
| २.३.२ | बँकेच्या भांडवल बाजारातील विगोपनाची मर्यादा |
| २.३.३ | निव्वळ किंमत (नेट वर्थ) ची व्याख्या |
| २.३.४ | भांडवल बाजाराच्या विगोपनामधून वगळलेल्या गोष्टी |
| २.३.५ | विगोपनाचा हिशेब |

| | |
|---|---|
| २.३.६ | दिवसामधील विगोपन |
| २.३.७ | मर्यादेतील वाढ |
| २.४ | इक्विटी (समभाग) साठी अर्थसहाय्य देणे व भाग भांडवलातील गुंतवणूक |
| २.४.१ | व्यक्तींना समभागावर कर्ज देणे |
| २.४.२ | पहिल्या सार्वजनिक इश्यूला अर्थ सहाय्य देणे |
| २.४.३ | बँकांच्या कर्मचा-यांना आपल्या बँकेचे समभाग घेण्यासाठी सहाय्य करणे |
| २.४.४ | शेअर दलाल व मार्केट मेकर्स यांना समभागावर कर्ज देणे |
| २.४.५ | एकत्रित धारण केलेल्या समभागावर व्यक्तींना किंवा तिस-या पक्षाला कर्ज देणे |
| २.४.६ | म्युच्युअल फंडाच्या युनिटवार कर्ज देणे |
| २.४.७ | इतर कर्जदारांना समभाग/कर्ज रोखे/रोखे यावर कर्ज देणे |
| २.४.८ | प्रवर्तकांच्या भागासाठी बँकेने कर्ज देणे |
| २.४.९ | ब्रिज लोन |
| २.४.१० | व्हेंचर कॅपिटल फंडमध्ये गुंतवणूक |
| २.४.११ | समभागावर कर्ज देताना/हमी देताना ठेवण्याचा फरक (मार्जिन) |
| २.४.१२ | भारत सरकारचा निर्गुंतवणूक कार्यक्रम |
| २.४.१३ | अ) परदेशी कंपनीतील समभाग ताब्यात घेण्यासाठी अर्थ सहाय्य देणे<br>ब) पुनः अर्थ सहाय्य |
| २.४.१४ | शेअर बाजारातील खरेदी विक्री व्यवहार |
| .४.१५ | मार्जिन ट्रेडिंग |
| २.५ | जोखीम व्यवस्थापन व अंतर्गत नियंत्रण व्यवस्था |
| २.५.१ | गुंतवणूक धोरण |
| २.५.२ | गुंतवणूक समिती |
| २.५.३ | जोखीम व्यवस्थापन |
| २.५.४ | लेखापरीक्षा समिती |
| २.६ | मूल्यमापन व जाहीर करणे |

| | |
|---|---|
| २.७ | बँका/वित्तीय संस्थांनी एकमेकांच्या भांडवलात गुंतवणूक करणे |
| २.८ | फरक (मार्जिन) च्या आवश्यकता |
| अ. | बँकेचे वस्तूंच्या बाजारात विगोपन (कमॉडिटी मार्केट) |
| ब. | करन्सी डेरिव्हेरिव्हज् बाबत बँकांचे विगोपन |
| २.९ | तारण नसलेल्या हमी व कर्जाच्या विगोपनवर मर्यादा |
| २.१० | समभाग/कर्जरोखे यांचा सर्व जनतेला केले इश्यू (पब्लिक इश्यू) बाबतचे सुरक्षा जाळे योजना |
| २.१०.१ | 'सुरक्षा जाळे' योजना |
| २.१०.२ | पुर्नखरेदी सुविधांची व्यवस्था |
| सूची-१ | पायाभूत सुविधांसाठी कर्ज देणे व पायाभूत सुविधा क्षेत्रांच्या अंतर्गत येणा-या गोष्टी |
| सूची-२ | कंपन्यांच्या रोख्याला हमी देणा-या अखिल भारतीय वित्तीय संस्थांची यादी |
| सूची-३ | भांडवल बाजार विगोपन मर्यादेपासून ज्यांच्या साधनांना इन्स्ट्रमेंटसना सूट मिळाली आहे अशांची यादी |
| सूची-४ | एकत्रित केलेल्या सूचीची यादी |

*विगोपन दंडकाबाबत मुख्य परिपत्रक*

*अ) उद्देश*
*या मुख्य परिपत्रकामध्ये रिझर्व बँकेने सूचिकृत व्यापारी बँकाना वैयक्तिक/सामूहिक कर्जदारांसाठी तसेच विशिष्ट उद्योग व विभाग यांच्यासाठी दिलेले पत विगोपनाच्या मर्यादांबाबत नियम/नियंत्रक तत्वे/सूचना तसेच बँकांच्या भांडवल बाजार विगोपनासाठीची मार्गदर्शक तत्वे /नियम/सूचना यांचे एकत्रीकरण केले आहे.*

*ब) वर्गीकरण*
*या सूचना म्हणजे रिझर्व बँकेने बँकिंग नियंत्रण कायदा १९४९ च्या अंतर्गत जारी केलेली वैधानिक मार्गदर्शक तत्वे आहेत.*

*क) पूर्वीच्या सूचना*
*या विषयाबाबत **सूची** ४ मध्ये दिलेल्या परिपत्रकाद्वारे दिल्या गेलेल्या सूचना या मुख्य परिपत्रकात एकत्रित केल्या आहेत व अद्यतन केल्या आहेत.*

*ड) सूचना लागू होणे*
*या सूचना विभागीय ग्रामीण बँका वगळून सर्व सूचिकृत व्यापारी बँकांना लागू होतात.*

*रचना*
*१. परिचय*
*२. मार्गदर्शक तत्वे*
*२.१ वैयक्तीक/सामूहिक कर्जदारांच्या बाबतीत पतविगोपन*
*२.२ उद्योग क्षेत्र किंवा काही विशिष्ट विभांगाच्या बाबतीत पतविगोपन*
*२.३ भांडवला बाजाराच्याबाबतीत पतविगोपन - दंडकांची योग्य कारण मीमांसा*
*२.४ समभागासाठी वित्तपुरवठा व भागभांडवलामध्ये गुंतवणूक*
*२.५ जोखमीचे व्यवस्थापन आणि अंतर्गत नियंत्रण व्यवस्था*
*२.६ किंमत काढणे व माहिती उघड करणे*
*२.७ बँक/वित्तिय संस्थांनी एकमेकांच्या भांडवलात गुंतवणूक करणे*
*२.८ वस्तूंच्या बाजाराच्याबाबतीत बँकांचे विगोपन - फरक (मार्जिनची गरज)*
*२.९ विनातारण हमी व अग्रिम उचल यांच्या बाबतीत विगोपनाच्या मर्यादा*
*२.१० समभाग, रोखे यांच्या पब्लिक इशूबाबत सुरक्षाजाळे योजना*

*३. सूची*
*सूची-१ पायाभूत सुविधा आणि सुविधा क्षेत्राखालील गोष्टी*
*सूची-२ कंपन्यांच्या रोख्यांची हमी देणा-या अखिल भारतीय वित्तीय कंपन्यांची सूची*
*सूची-३ ज्या अखिल भारतीय वित्तीय कंपन्यांच्या इन्स्ट्रमेंटस्ना भांडवल बाजाराच्या विगोपन मर्यादेतून सूट मिळाली आहे त्यांची यादी*
*सूची-४ एकत्रित केलेल्या परिपत्रकाची यादी*

## १. *परिचय*

*रिझर्व बँकेने, बँकांना त्यांच्या जोखमीचे व्यवस्थापन करण्याचा चांगला मार्ग म्हणून विशिष्ट उद्योग वा क्षेत्रामधील विगोपनाबाबत मर्यादा घालून घेण्याचे व वैयक्तिक व सामूहिक कर्जदारांच्या बाबतीतील विगोपनासाठी मर्यादा घालण्याचे आदेश दिले आहेत. त्याखेरीज बँकांना खालील बाबतीत काही वैधानिक आणि नियंत्रणात्मक विगोपन मर्यादा घालून घ्यायचे आदेश दिले आहेत. भागभांडवलात रोख्यात, म्युच्युअल फंडच्या युनिटस्‌मध्ये व व्हेंचर कॅपिटल फंड मधील गुंतवणूक व त्यावरील तारणकर्ज विगोपन मर्यादेबाबत बँकांनी खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करावा.*

## २. *मार्गदर्शक तत्वे*

### २.१ *वैयक्तिक कर्जदारांच्या बाबतीत विगोपन*

#### २.१.१ *मर्यादा*

२.१.१.१ *वैयक्तिक कर्जदाराबाबत ही मर्यादा भांडवल फंड्सच्या १५% व सामूहिक कर्जदाराबाबत ४०% असेल. यासाठी भांडवल फंड्समध्ये भांडवल पूर्तता मानक (कॅपिटल ॲडक्विसी स्टडर्ड) मध्ये दिल्याप्रमाणे स्तर १ व स्तर २ भांडवलाचा समावेश होतो. (या मुख्य परिपत्रकाचा परिच्छेद २.१.३.५ पहावा)*

२-१-१-२ *वैयक्तिक कर्जदाराबद्दल ही मर्यादा ५% ने वाढू शकते (१५ ची २०% होऊ शकते) मात्र हे ५% पायाभूत सुविधाप्रकल्पासाठी दिले गेले असले पाहिजेत. सामूहिक कर्जदारांबाबत ती मर्यादा १०% ने वाढू शकते. (४० ची ५०% होऊ शकते) मात्र हे १०% पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी दिले गेले असले पाहिजेत. पायाभूत सुविधांसाठी कर्ज देणे व पायाभूत प्रकल्पामधील गोष्टी या* ***सूची १*** *मध्ये दिल्या आहेत.*

२-१-१-३ *वरील परिच्छेद २.१.१.१ व २.२.२.२ मध्ये परवानगी दिलेल्या विगोपनाखेरीज अपवादात्मक परिस्थितीमध्ये बँक त्यांच्या निदेशक मंडळाच्या परवानगीने कर्जदाराच्या (वैयक्तिक किंवा सामूहिक) बाबतीत विगोपनाच्या मर्यादा अजून ५% वाढवू शकतात. मात्र त्यासाठी बँकांनी त्यांच्या वार्षिक अहवालामध्ये आवश्यक ती माहिती दिली पाहिजे.*

२-१-१-४ *२९ मे २००८ पासून ज्या तेल कंपन्यांनी तेल रोखे जारी केले आहेत. (व ज्यांना एस्.एल्.आर. दर्जा नाही) अशा कंपन्या वैयक्तिक कर्जदार असल्यास त्यांच्याबाबत विगोपन मर्यादा २५% पर्यंत वाढवली आहे. याखेरीज बँका अपवादात्मक परिस्थितीमध्ये परिच्छेद २.१.१.३ मध्ये दिल्याप्रमाणे तेल कंपन्यासाठी भांडवल फंडाच्या आणखी ५% विगोपनाची मर्यादा वाढवू शकतात.*

२-१-१-५ *ज्या विगोपन मानदंडकापेक्षा जास्त विगोपन झाले आहे त्यांच्या बाबतीत वार्षिक लेखा पत्रकामध्ये 'लेखा टीपा' यामध्ये योग्य ती माहिती दिली पाहिजे.*

**२-१-१-६** *बँकेचे एका गैर बँकिंग वित्तीय कंपन्या/मालमत्ता वित्त कंपनी मध्ये विगोपन अद्यतन लेखा परिक्षित ताळेबंदानुसार बँकेच्या भांडवल फंडाच्या अनुक्रमे १०%/ १५% पेक्षा जास्त असता कामा नये. मात्र जर त्या गैर बँकिंग वित्तीय कंपनीने/मालमत्ता वित्त कंपनीने जर पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी वित्तसहाय केले असेल तर ही मर्यादा त्या कंपन्यातील विगोपनाच्या बाबतीत १५% / २०% पर्यत वाढवता येते. बँकांनी सर्व गैरबँकिंग वित्तीय कंपन्यांसाठी एकूण विगोपनासाठी अंतर्गत मर्यादा ठरवून घ्यावी. भांडवल फंड ठरवण्यासाठी ताळेबंद प्रसिद्ध झाल्यानंतर भांडवल उभे केले तर ते ही हिशेबात धरता येईल. भांडवल उभे केल्यानंतर बँकेने बाहेरच्या लेखा परिक्षकाचे प्रमाणपत्र घ्यावे व तो रिझर्व बँकेच्या बँकिंग पर्यवेक्षण विभागाला भांडवलातील वाढ ठरवण्याआधी पाठवून द्यावा.*

२-१-१-७ *एकत्रितपणे कर्ज देण्याच्या व्यवस्थेखाली दिलेले कर्ज - या व्यवस्थेखाली दिलेल्या कर्जाला सुद्धा वरील विगोपन मर्यादा लागू होतील.*

२-१-१-८ *पतपत्राखाली बिलाचे पैसे देणे (बिल डिस्काउंटिंग)* पतपत्राखाली खरेदी/पैसे दिलेले/निगोशिएट केलेल बिल (जेथे लाभार्थी रिझर्व खाली नसतो) हे पतपत्र देण्या-या बँकेचे विगोपन धरले जाईल व कर्जदारावरचे विगोपन धरले जाणार नाही. जेंव्हा बिल अंडर रिझर्व निगोशिएटर होते तेंव्हा ते कर्जदारावरचे विगोपन समजावे.

### २-१-२ पुनर्वसन

२.१.२.१ *आजारी/दुर्बल औद्योगिक एकाकाचे*

वैयक्तिक /सामूहिक विगोपन मर्यादा पुनर्वसन होत असलेल्या आजारी दुर्बल औद्योगिक एकात्मक (व्याज व दंड धरून) दिलेल्या सध्याच्या/अधिक पत सवलतींना लागू होत नाहीत.

२.१.२.२ *अन्नधान्यावर पतपुरवठा*

ज्या कर्जदारांना रिझर्व बँकेने थेट अन्नधान्यावर पतपुरवठा केला आहे, त्यांना मर्यादेतून सूट दिली आहे.

२.१.२.३ *भारत सरकारची हमी*

ज्या बाबतीत मुद्दल व व्याजाची भारत सरकारने पूर्ण हमी दिली असेल तेथे या मर्यादा लागू होत नाहीत.

२.१.२.४ *स्वतःच्या मुदत ठेवीवर कर्जे*

बँकेच्या स्वतःच्या मुदत ठेवीवर दिलेले कर्ज (फंडेड व नॉन फंडेड सुविधा) यावर जेवढा बँकांचा बोजा असेल तेवढा विगोपनामध्ये धरले जात नाही.

२-१-२-५ *नाबार्डच्या बाबतीत विगोपन* - बँकेने नाबार्डवर जे विगोपन केले आहे ते वैयक्तिक/सामूहिक विगोपन मर्यादेत धरत नाहीत. बँकेच्या निदेशक मंडळाच्या अनुमतीने बँका नाबार्डमध्ये किती विगोपन करायचे या बाबत धोरण ठरवू शकतील.

परंतु बँकांनी हे लक्षात ठेवावे की पोर्टफोलियो गुंतवणूकीच्या वर्गीकरण, मूल्यांकन व व्यवहारा बद्दलच्या मानदंडकाबाबतच्या मुख्य परिपत्राकामध्ये दर्जा न ठरवलेल्या बिगर एस्.एल्.आर. प्रतिभूतीमध्ये गुंतवणूक करण्याचे निर्बंध आहेत, त्यातून सूट नाही.

### २-१-३ *व्याख्या*

२.१.३.१ *विगोपन*

विगोपनामध्ये पत विगोपन (फंडेड व नॉन फंडेड पत मर्यादा) व गुंतवणूक विगोपन (अंडररायटिंग व तत्सम बांधलकी) यांचा समावेश होतो. विगोपन मर्यादा मोजताना मंजूर केलेली मर्यादा किंवा प्रत्यक्ष देय (आऊटस्टँडींग) हेच विगोपन समजावे.

२.१.३.२ *साधित प्रॉडक्टच्या पतविगोपनाचे मोजमाप*

व्याजदर व परकीय विनिमय साधित प्रॉडक्ट व सोने यामुळे निर्माण होत असलेल्या विगोपनाचे मोजमाप बँकांनी 'चालू विगोपन पद्धती' या पद्धतीने करावे. जर पूर्ण अधिकार/शुल्क किंवा आय रक्कम पूर्ण आला असेल तर पत विगोपनाचा हिशेब करताना बँकांनी 'विकलेला पर्याय (सोल्ड ऑप्शन)' वगळावा.

Current Exposure Method

१) चालू विगोपन पद्धतीने हिशेब करून काढलेली बाजाराशी संबंधीत ऑफ बॅलन्सशीट व्यवहारांची सममूल्य पत चालू पत विगोपन व करारांचे संभाव्य भावी. पतविगोपन यांची बेरीज असेल. जर पूर्ण अधिभार/शुल्क किंवा आय रक्कम पूर्ण आली असेल तर पतविगोपनाचा हिशेब करताना बँकांनी 'विकलेला पर्याय (सोल्ड ऑप्शन)' वगळावा.

२) चालू पत विगोपन म्हणजे या करांराच्या धन बाजार मूल्यांची बेरीज. या पद्धतीने विगोपन काढण्यासाठी या करारांच्या बाजारात मार्किंग करून त्यांचे चालू पत विगोपन काढावे लागते.

३) संभाव्य भावी मत विगोपन ठरवताना प्रत्येक कराराची प्रतिकात्मक मुद्दलाच्या किंमतीला (मग त्या कराराची बाजार मूल्य शून्य, धन किंवा ऋण असो) त्याचा इंस्ट्रमेंटच्या प्रकारानुसार उर्वरित मुदतीनुसार ठरवलेल्या, खाली दिलेल्या घटकाने गुणून येणारी किंमत ही संभाव्य भावी पतविगोपन असेल.

| ऑफ बॅलन्स शीट घटकांसाठी बाजाराशी संबंधीत पत परिवर्तन घटक (सीसीएफ) | | |
|---|---|---|
| उरलेली मुदत | पत परिवर्तन घटक, | |
| | व्याज दर करार % | विनिमय दर करार व सोने % |
| १ वर्ष किंवा कमी | ०.५० | २.०० |
| १ ते ५ वर्षे | १.०० | १०.०० |
| ५ वर्षां पेक्षा अधिक | ३.०० | १५.०० |

४) मुद्दलाचे विविध परस्पर बदल होणा-या करारांसाठी ॲड ऑन फॅक्टर्सना करारातील उरलेल्या देया ने (पेमेंट) गुणावे.

५) जे करार विशिष्ट तारखेला पूर्ण करायचे असतात व कराराच्या अटी अशा रीतिने बदलल्या जातात की त्या कराराची बाजारातील किंमत शून्य होते. उरलेली परिपक्व किंमत पुढच्या पुनर्निधारीत तारखे पर्यत ढकलली जाते. पण ज्या व्याज दर कराराची उरलेली मुदत एक वर्षापेक्षा जास्त आहे व जे वरील अटींची पूर्तता करतात. त्यांच बाबतीत सीसीएफ किंवा ॲड ऑन फॅक्टर १% पेक्षा जास्त नसेल.

६) एकच चलन तरंगत्या/तरंगत्या व्याज बदलाच्या करारासाठी पत विगोपन बाजारातील किंमतीवर काढण्यात येईल.

७) भावी संभाव्य विगोपन वरवर दिसणा-या नाममात्र रकमेवर अवलंबून न ठेवता परिणामकारक रकमेवर ठेवावी. जर नाममात्र रक्कम व्यवहाराच्या चौकटीमध्ये वाढली तर बँकांनी ही वाढलेली रक्कम भावी संभाव्य विगोपन ठरवण्यासाठी वापरावी. उदाहरणार्थ ठरलेल्या नाममात्र १ मिलियन दराने असेल तर परिणामकारक नाममात्र रक्कम २ मिलियन अमेरिकन डॉलर्स असेल.

२-१-३-३ पत निगोपन

पत निगोपनमध्ये खालील गोष्टी येतात

(अ) सर्व त-हेच्या फंडेड व नॉन फंडेड पत मर्यादा

(ब) उपकरणे भाडयाने देणे भाडे खरेदी वित्त सहाय्य व अडत्याची (फॅक्टरिंग) सेवा

२-१-३-४ गुंतवणूक विगोपन

अ) गुंतवणूक विगोपनामध्ये खालील गोष्टी येतात

१) कंपन्यांच्या भाडभांडवलात व कर्जरोख्यात गुंतवणूक

२) सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या कर्ज रोख्यात गुंतवणूक

३) कमर्शियल पेपर्समध्ये गुंतवणूक

ब) एस.सी./आर.सी.ने आर्थिक मालमत्ता विकल्यानंतर जी भरपाई मिळते त्याच्या मध्ये बँकांनी कर्ज रोखे/रोखे/सुरक्षित पावती/पास थ्रू सर्टिफिकेट हे त्या एस.सी./आर.सी. मध्ये विगोपन समजले जाईल. असामान्य घटना लक्षात घेऊन वित्तीय संस्थांना सुरूवातीच्या वर्षांमध्ये मामल्यानुसार दंडकात घालून दिलेल्या विगोपनाच्या मर्यादा शिथील केल्या जातील.

क) पी.एफ.आय. [१] ने हमी दिलेल्या (**सूची २** मध्ये दिलेल्या यादीनुसार) कंपन्यांच्या रोख्यात व बॉड्समध्ये गुंतवणूक ही पी.एफ.आय. मधील बँकेचे विगोपन समजले जाईल व कंपनीवरील विगोपन समजले जाणार नाही.

ड) पी.एफ.१ ने कंपन्यांच्या रोख्यांना जारी केलेल्या हमी नॉन फंडेड असल्यामुळे ५०% पर्यंत पी.एफ.आय. चे कंपन्यांमधील विगोपन समजले जाईल. पण याच बाबतीत बँकेचे विगोपन १००% धरले जाईल. परंतु पी.एफ.१ ने रोखे/बॉड्सला हमी देताना ज्या एककाला हमी दिले आहे त्याचे आर्थिक व्यवस्थे खालील एकूण विगोपन ध्यानात घ्यावे.

[१]आय.सी.आय.सी.आय लिमीटेडचा आय.सी. आय.सी.आय. बँकेत ३०.०३.२००२ पासून विलय झाल्यानंतर आय.सी.आय.सी.आय लिमिटेडच्या सर्व जबाबदा-या आय.सी.आय.सी.आय. बँक लिमिटेडच्या घेतल्या आहे. विलय योजनेनुसार सरकारने आय.सी.आय.सी.आय.लिमीटेडला दिलेल्या सर्व कर्जे व हमी सुविधा विलय झाल्यानंतर निर्माण झालेल्या संस्थेला हस्तांतरित केले जाईल. बँकांना पूर्वीच्या आय.सी.आय.सी.आय लिमिटेडच्या केलेल्या गुंतवणुक परत देई पर्यंत ४०% मर्यादेच्या बाहेर समजल्या जातील.

आय.डी.बी.आय. बँक लि.चा आय.डी.बी.आय.लि मध्ये २ एप्रिल २००५ पासून विलय झाल्यानंतर पूर्वीच्या आय.डी.बी.आय. बँक लि.च्या सर्व जबाबदा-या नवीन संयुक्त इंडस्ट्रीय डेव्हलमेंट बँक ऑफ इंडिया या संस्थेने घेतल्या आहेत. नाव बदलेल्या मुळे विगोपन मर्यादेसाठी पूर्वीच्या आय.डी.बी.आय.लि. मध्ये केलेल्या गुंतवणुकी परत देई पर्यंत या बँकेचे आय.डी.बी.आय.लि.वरील विगोपन समजले जाईल व कंपनीवर विगोपन असणार नाही. त्याचप्रमाणे बँकांनी पूर्वीच्या आय.डी.बी.आय. मध्ये केलेल्या गुंतवणुका परत देई पर्यंत ४०% मर्यादेच्या बाहेर समजल्या जातील.

२-१-३-५ <u>भांडवली फंड</u>

*भांडवली फंड म्हणजे भांडवली पूर्तता मानका खाली व्याख्या दिलेले व आदल्या वर्षाच्या ३१ मार्चचे प्रसिद्ध झालेल्या ताळेबंदानुसार स्तर १ व स्तर २ भांडवल. परंतु देशांतर्गत किंवा परदेशी इशूमधून स्तर १ व स्तर २ भांडवल आणल्यास विगोपन मर्यादा ठरवण्यासाठी त्याचा विचार केला जाईल. (परकीय बँकांच्या भारतात काम करणा-या शाखांच्या बाबतीत नवीन भांडवल पूर्तता नियमाच्या बाबतीतील मुख्य परिपत्रकानुसार त्यांच्या मुख्य कार्यालयातून आलेले पैसे हे सुद्धा विगोपन मर्यादा ठरवताना लक्षात घेतले जातील.) इतर मार्गाने वाढलेले भांडवली पैसे (जसे दर तिमाहीला होणारा फायदा) बँकांनी बाहेर जाणारे विगोपन भविष्यकाळात भांडवल येईल या अपेक्षेने घेऊ नये.*

२.१.३.६ <u>समूह</u>

*समूहाची कल्पना व कोणते कर्जदार एखाद्या समूहात येतात की नाही हे ठरवणे त्या बँकेवर/ वित्तीय संस्थेवर सोपवले आहे. आपली जोखीम मालमत्ता नियंत्रित करण्याच्या दृष्टीकोनातून बँकांना आपल्या ग्राहकांची सर्वसाधारणपणे माहिती असते. त्यामुळे एखादा कर्जदार कोणत्या समूहात मोडतो हे बँकांकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर त्या ठरवतात यासाठी व्यवस्थापन समान असणे*

*व परिणामकारक नियंत्रण ही मार्गदर्शक तत्वे आहेत. सार्वजनिक उपक्रमांच्या बाबतीत कर्जदार विगोपन मर्यादा लागू पडेल.*

*ब) समूहात फूट पडली व ती औपचारिकरित्या मान्य झाली तर वेगळे झालेले गट हे वेगळे एकक मानले जातील तर त्यांनी रिझर्व बँकेला या बाबतीत अंतिम निर्णय विचारावा व समूहाच्या खाली आपली येऊ नये यासाठी फूट पाडली गेली असण्याची शक्यता तपासून पहावी.*

**२-१-४ <u>आढावा</u>**

*विगोपन व्यवस्थापनासाठी कोणत्या उपाय योजना बँकेने केल्या त्याचा आढावा निदेशक मंडळाच्या पुढे जून अखेरच्या आधी सादर करावा.*

**२-२ <u>उद्योग व काही विभागांच्या पत विगोपन</u>**

**२.२.१ <u>अंतर्गत विगोपन मर्यादा</u>**

२.२.१.१ <u>विभागीय मर्यादा निश्चित करणे</u>

*वैयक्तीक किंवा सामूहिक कर्जदारांच्या विगोपन मर्यादा ठरवण्याबरोबरच बँकांनी विशिष्ट विभांगासाठी बांधीलकीच्या अंतर्गत मर्यादा ठरवाव्यात उदाहरणार्थ वस्त्रोद्योग, ज्यूट, चहा इत्यादी त्यामुळे विगोपन विविध क्षेत्राकडे वाटले जाते. या मर्यादा ठरवताना बँकेने विविध क्षेत्राचे काम व त्या त्या क्षेत्रातील जोखीम किती आहे ते पहावे. वेळोवेळी या मर्यादेचे अवलोकन करावे व या मर्यादा आवश्यकता असल्यास बदलाव्यात.*

२.२.१.२ <u>कंपन्यांचे अनहेज्ड (तोटा टाळण्यासाठी तरतूद न केलेले) परकीय चलन विगोपन</u>

*आपल्या ग्राहकांच्या परकीय चलन विगोपनामुळे उद्भवणारी जोखीम बँकेला समजली आहे व त्याची त्यांनी योग्य ती नोंद घेतली आहे याची खात्री करून घेण्यासाठी प्रत्येक बँकेने असे धोरण आखावे की १० मिलियन डॉलर (किंवा बँकेचा पोर्टफोलियो लक्षात घेऊन बँकेला जी खालची मर्यादा योग्य वाटेल ती) पेक्षा जास्त कर्जे मंजूर करताना ती केवळ स्पष्टपणे ठरवलेल्या*

*निदेशक मंडळाच्या धोरणानुसारच दिली जावी. या धोरणात अशा व्यवहारापासून होणारा तोटा टाळण्याची तरतूद असावी. अशी धोरणे ठरवताना बँकेने खालील गोष्टी वगळाव्यात.*

- *जेंव्हा निर्यातीला अर्थसहाय्य करण्यासाठी परकीय चलन कर्ज दिली जातात तेंव्हा बँकांनी हेजिंगची सक्ती करू नये पण अशा ग्राहकांकडे कर्जाच्या रकमेची तरतूदी इतके येणे रकमा असतील.*
- *जेंव्हा विदेशी चलनातील खर्च करण्यासाठी परकीय चलनात कर्ज दिले जाते.*

*बँकांनी धोरण ठरवताना त्यांच्या सर्व ग्राहकांच्या (लघु व मध्यम उपक्रम धरून) अनहेजड विदेश विनिमय विगोपनाचा विचार करावा. सर्व ग्राहकांचे अनहेजड परकीय चलन विगोपन ठरवताना सर्व स्त्रोताकडून आलेले विगोपन लक्षात घ्यावे. त्यात परकीय चलनातील कर्ज व बाहय व्यापारी कर्जे लक्षात घ्यावी.*

*ज्या ग्राहकांचे परकीय चलन विगोपन जास्त आहे (उदा. अंदाजे २५ मिलीयन अमेरिकन डॉलर) त्यांच्या विदेश विनिमय विगोपनाचा अनहेजड भागावर योग्य अहवाल व्यवस्थेद्वारे दर महिन्याला नियंत्रण ठेवावे. इतर बाबतीत हे नियंत्रण दर तिमाहीला ठेवावे.*

*अनेक बँकांनी एकत्र मिळून कर्ज देण्याच्या बाबतीत गटाच्या मुख्य बँकेने, ज्या बँकेचे विगोपन जास्तीत जास्त आहे. त्यांनी हया नियंत्रणामध्ये पुढाकार घ्यावा.*

*२.२.१.३ <u>स्थावर मालमते बाबत विगोपन</u>*

*१) स्थावर मालमतेच्या बाबतीत कर्ज देण्याबाबत बँकांनी जास्तीत जास्त कर्ज किती द्यायचे, कर्जाच्या वैयक्तिक/सांघिक मर्यादा, मार्जिन (फरक), सुरक्षिततेचे उपाय, कर्ज फंडाचे हप्ते व पुरवणी वित्त या बाबतचे धोरण बँकेने ठरवावे.*

*२) स्थावर मालमत्तेसाठीचे कर्ज मंजूर करताना कर्जदारांनी त्यांच्या प्रकल्पासाठी जिथे जिथे आवश्यक आहे. तिथे सरकार/स्थानिक सरकार/ इतर वैधानिक अधिकारी यांची पूर्व परवानगी घेतली आहे की नाही याची खात्री करून घ्यावी. या प्रक्रियेला बाधा येऊ नये म्हणून विविध मंजुरी घेतल्या नंतरच कर्जाचे वाटप करावे. स्थावर मालमत्तेच्या विगोपनासंबंधीचे धोरण ठरवताना बँका राष्ट्रीय बांधकाम नीतीचे पालन करण्याचे नियम आपल्या धोरणात समाविष्ट करू शकतात. या बांधकाम नीतीची माहिती भारतीय मानद संस्थेच्या संकेत स्थळावर (www-bis-org-in) उपलब्ध आहे.*

*३) मानदंडकाच्या दृष्टीकोनातून भांडवल पूर्तता व जोखमीसाठी विशेष आर्थिक विभागात एकक स्थापणे व त्यातील एकक घेणे यासाठी जे विगोपन होईल ते स्थावर मालमत्तेचे साठीचे विगोपन समजले जाईल म्हणून सध्याच्या मार्गदर्शक तत्वांनुसार बँकांना अशा विगोपनाला योग्य ती जोखीम लावावी लागेल व त्यासाठी तरतूद करावी लागेल. वरील विगोपन हे पायाभूत सुविधा -- सवलती मिळण्याच्यासाठीच फक्त लक्षात घेतले जाईल.*

*४) बँकेचे धोरण आखताना रिझर्व बँकेने घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे ध्यानात घेतली पाहिजेत बँकेने दिलेली पत ही स्थावर मालमत्तेच्या जुगारासाठी वापरली जात नाही व उत्पादक बांधकामासाठीच वापरली जात आहे हयाची बँकेने खात्री करून घ्यावी.*

***२.२.२ <u>भाडेपट्टाकरार, भाडेखरेदी व अडत्यांच्या सेवा यांच्या बाबतीत विगोपन</u>***

*बँकांना वरील व्यवसाय शाखेमार्फत करायला परवानगी देण्यात आली आहे. जिथे बँका हा व्यवसाय शाखा मार्फत करतात तेथे या सेवा व एकूण पत पुरवठा यांचा संतुलित पोर्टफोलियों ठेवावा. या व्यवसायाचे एकूण विगोपन एकूण कर्जाच्या १०% पेक्षा जास्त असू नये.*

***२.२.३ <u>भारतीय सहकंपन्या/परदेशातील पूर्ण मालकीच्या उपकंपन्या भारतीय कंपन्यांच्या परदेशातील स्टेपडाऊन उपकंपन्या</u>***

*२.२.३.१ उपरोक्त कंपन्यांना पत/विनापत सुविधा (जसे पतपत्र व हमी) द्यायला बँकाना अनुमती आहे. भारतातून माल व सेवा यांची निर्यात व्हावी यासाठी परदेशातील ग्राहकांना खरेदीदरची पत/बिले घेणे या सुविधा बँका त्यांच्या तारतम्याने देऊ शकतात.*

*२.२.३.२ वरील विगोपनाच्या बँकाच्या न बिघडलेल्या भांडवलाच्या (स्तर १ व स्तर २ भांडवलाच्या) २०% इतकी मर्यादा आहे. तसेच खालील अटी लागू आहेत.*

*१) ज्या संयुक्त उद्योगामध्ये भारतीय कंपनीचा सहभाग ५१% पेक्षा जास्त असतो, त्यांनाच कर्ज मिळेल.*

*२) अशा परदेशी कर्ज देण्यामुळे निर्माण झालेल्या पत जोखमीचे व व्याज दर जोखमीचे व्यवस्थापन करण्यासाठी योग्य व्यवस्था घालून दिली असली पाहिजे.*

*३) या सुविधा देताना बँकांना बँकिंग नियंत्रण कायद्याच्या १९४९ च्या कलम २५ ची पूर्तता केली पाहिजे. या कलमानुसार बँकिंग कंपनीचा प्रत्येक तिमाहिच्या शेवटच्या शुक्रवारी व्यवसाय बंद होताना मालमत्ता भारतातील मागणी व समय जबाबदारीच्या (डिमांड व टाईम लायबिलिटीच्या) ७५% पेक्षा कमी असता नये. म्हणजेच भारताबाहेरची एकूण मालमत्ता मागणी व समय जबाबदारीच्या २५ पेक्षा जास्त असता कामा नये.*

*५) अशा व्यवहारातून जे मुदतपूर्णतेचे फरक पडतात ते रिझर्व बँकेने मान्य केलेल्या सर्वसाधारण फरकांच्या मर्यादेत असले पाहिजे.*

*६) सध्याचे सुरक्षिततेचे उपाय/भांडवल पूर्ततेचे सारासार विचार दंडक/विगोपनाचे दंडक यांची पूर्तता ही पत/पतीव्यतिरिक्त विगोपनाला लागू होतात.*

*७) स्टेपडाऊन उपकंपनीची व्यवस्था अशी असली पाहिजे की त्यांनी दिलेल्या सुविधांवर बँका परिणामकारकरित्या लक्ष ठेवू शकतील.*

२.२.२.३ अशा त-हेचे पत/पतीव्यतिरिक्त इतर सुविधांच्या कर्जाचे धोरण आखताना खालील गोष्टी लक्षात ठेवावा.

अ) कर्ज मर्यादा मंजूर घेताना प्रकल्पांना पाठिंबा देणा-या प्रवर्तकांच्या किर्तीकडे लक्ष न देता प्रकल्पाची व्यापारी व्यवहार्यता ध्यानात घ्यावी. फंडवर आधारीत नसलेल्या सुविधांना त्याच मर्यादा लागू होतात की ज्या फंडवर आधारित सुविधांना लागू होतील.

ब) ज्या देशांमध्ये सहकंपन्या/संपूर्णपणे मालकीच्या उपकंपन्या स्थित आहेत त्या देशांमध्ये परकीय चलनामध्ये कर्ज घेणे किंवा पैसे बाहेर पाठवणे यावर बंधने असू नयेत. तसेच तेथे अनिवासी बँकांना तेथील मालकत्तेवर कायदेशीर बोजा ठेवण्याची व आवश्यकता असल्यास मालमत्ता विकण्याची अनुमती असावी.

२.२.२.४ उपरोक्त परिच्छेद २.१ मध्ये दिलेले भांडवल पूर्तता, आणी विगोपन दंडक या बाबतचे सध्याच्या सुरक्षितता योजना/सारासार विचार मार्गदर्शक तत्वे यांची बँकांनी पूर्तता करावी.

## २-३ बँकांचे भांडवली बाजाराला विगोपन

दंडकात सुधारणा-२००५-०६ च्या वार्षिक धोरणाच्या मध्यावधी अवलोकनामध्ये घोषीत केल्याप्रमाणे बँकांना सूचित केलेले सारासार विचार भांडवल बाजार विगोपन दंडक हे पाया व आवका या बाबतीत सुधारले गेले आहेत. त्यानुसार सध्याच्या मार्गदर्शक तत्वे सुधारली गेली व **१ एप्रिल २००७** पासून अमलात आणली गेलेली तत्वे खालील प्रमाणे आहेत.

### २.३.१ भांडवल बाजार विगोपनाचे घटक (सी.एम्.ई.)

भांडवल बाजार विगोपनामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दोन्ही विगोपनांचा समावेश होतो. फंड वर आधारीत असलेले व नसलेले सर्व त-हेचे बँकांचे भांडवल बाजारील विगोपन यात खालील गोष्टींचा समावेश असेल.

१) समभाग, परिवर्तनीय कर्ज रोखे, परिवर्तनीय रोखे व समभागाकडे कल असलेल्या म्युच्युअल फंडांची युनिटस की ज्यांचे पैसे केवळ कंपन्यांच्या कर्जात गुंतवलेले नसतात.

२) वैयक्तीक ग्राहकांना समभाग (आयपीओ/ईएसओपी धरून) परिवर्तनीय रोखे, परिवर्तनीय कर्ज रोखे व समभागाकडे कल असलेल्या म्युच्युअल फंडात गुंतवणूक करण्यासाठी समभाग/ कर्जरोखे/रोखे किंवा इतर प्रतिभूती किंवा विनातारण अग्रिम उचल देणे.

३) समभाग, परिवर्तनीय कर्ज रोखे, परिवर्तनीय रोखे वा समभागाकडे कल असलेल्या म्युच्युअल फंडाची युनिट्स हे मुख्य तारण ठेवून कोणत्याही कारणासाठी दिलेले कर्ज.

४) ज्या कर्जासाठी समभाग, परिवर्तनीय कर्ज रोखे, परिवर्तनीय रोखे वा समभागाकडे कल असलेल्या म्युच्युअल फंडाची युनिट्स ही अनुषांगिक तारण म्हणून ठेवली असेल म्हणलेच जेथे या व्यतिरिक्त ठेवलेल्या तारणामुळे कर्जाची रक्कम पूर्ण होत नसेल अशी कर्जे.

५) शेअर दलालीना दिलेले सुरक्षित व असुरक्षित कर्जे व शेअरदलाल व मार्केट मेकर्स यांच्या तर्फे दिलेल्या हमी.

६) नवीन कंपन्यांसाठी पैसे गोळा करता येतील या अपेक्षेने नवीन कंपन्यांमध्ये प्रवर्तकांनी समभागात गुंतवणूक करण्यासाठी कंपन्यांना उपभाग/रोखे/कर्ज रोखे वा अन्य तारणावर किंवा वितारण असे दिलेले कर्ज.

७) कंपन्यांना अपेक्षित इशूचे किंवा येणा-या पैशाच्या अपेक्षेने दिलेले ब्रिजलोन

८) बँकांनी समभाग, परिवर्तनीय रोखे, परिवर्तनीय कर्ज रोखे, किंवा समभागाकडे कल असलेल्या म्युच्युअल फंडाच्या युनिट्सच्या बाबत अंडररायटिंग बांधिलकी. परंतु १६ एप्रिल,२००८ पासून बँका एका बँकेच्या तसाच एकत्रित बँकांचे बुकरनिंग पद्धतीमधून भांडवल बाजार विगोपन काढण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या तसेच त्यांच्या उपकंपन्यांच्या अंटररायटिंग बांधिलकी वगळू शकतात. त्या बाबीचा भविष्यात फेरविचार करण्यात येईल.

९) मार्जिन ट्रेडिंगसाठी शेअर ब्रोकरना वित्त पुरवठा करणे.

१०) व्हेंचर कॅपिटल फंड्सच्या बाबतीत (नोंदणीकृत व नोंदणी न केलेले) विगोपन

२.३.२ भरपाई च्या अचल वचनबध्दता (आय पी सीज) अशा प्रकारच्या अशिलांद्वारे व्यवहारांची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी देशी म्युच्युअल फंड/एफ आय आय च्या वतीने स्टॉक एक्स्चेंजला भरपाईच्या अचल वचनबध्दता जाहिर करतात. इक्विटी किमतींमधील हालचाली, अशिलांकडुन चुका होण्याच्या शक्यता यांच्या सारख्या वाईट स्थितींपासून बँकांचा बचाव करण्यासाठी देशातील भांडवल बाजारपेठेच्या कार्यान्वयामध्ये कुठलाही अनुचित अडथळा नसल्याची खात्री करुन घेत असताना, जोखीम कमी करण्याच्या

*खालील उपाययोजना दिल्या गेल्या आहेत, ज्या १ नोव्हेंबर २०१० ३१ ऑक्टोबर २०११ या कालावधीपर्यंत प्रभावी असतीलः*

*१. कोणत्याही प्रकारच्या परिनिर्धारणामध्ये भरपाईच्या स्वरुपात सुरक्षा ठेवींवर हस्तांतरीत न होऊ शकणारा अधिकाराचा मुद्दा करारामध्ये आंतर्भुत करणा-या संरक्षक बँकाना आय पी सीजचे वितरण करण्याची मुभा दिली गेली आहे. परंतु, जिथे व्यवहार अग्रिम नीधींच्या स्वरुपामध्ये होतात उदा. जेथे स्पष्ट स्वरुपाचे परदेशी निधी अशिलाच्या खात्यामध्ये उपलब्ध असतात अशा स्थितींमध्ये आणि एफ एक्स व्यवहारांच्या स्थितीत बँकांचे नॉस्ट्रो खाते संरक्षक बँकेमार्फत आय पी सीच्या वितरणाआधीच क्रेडिट केले जाते, भरपाई म्हणुन मिळणा-या सुरक्षा ठेवींवरील हस्तांतरीत होऊ न शकणा-या अधिकाराच्या अशिलांसोबतच्या करारामध्ये आंतर्भाव करण्याला सक्तीचे केले जाणार नाही.*

*आय पी सीचे वितरण करणा-या संरक्षक बँकांची बहुतांश जोखीम ५० एवढी गणली जाईल, त्यासाठी व्यापाराच्या दिवसापासुन (टि)एफ आय आय/म्युच्युअल फंड एक्विटी किमतींच्यामध्ये होणारी लागोपाठच्या दोन दिवसांमधली घट टि/१ आणि टि /२ च्या प्रत्येकी २० सोबत पुढच्या घट होण्याच्या हालचालीसाठी अतिरीक्त मार्जिन १०.*

*३. त्याचप्रमाणे टि/१ वरच्या सक्षम जोखमीचे गणन परिनिर्धारण रकमेच्या ५० एवढे केले जाते आणि जर मार्जिन भरपाई परत आली नसल्यास, हि रक्कम सी एम ई च्या स्वरुपामध्ये टि /१च्या शेवटी गणन केली जाते.*

*४. टि /१ वरील अर्ली पे एनच्या स्थितीमध्ये , भांडवल बाजारपेठ प्रदर्शन नसेल. टि /१ याचा अर्थ आपण भारतीय वेळेनुसारची दिवसाची अखेर (ई ओ डी) असा घेतो. त्यामुळे भारतीय वेळे नुसार, ई ओ डि नंतर मिळालेले निधी टि/१ वरील अर्ली पे इन च्या स्वरुपामध्ये गणले जाणार नाहीत.*

*५ टि/१ वरील मार्जिनची रक्कम रोख दिली गेल्यास, सी एम ई चे गणन परिनिर्धारण रकमेच्या ५० एवढी रक्कम वजा दिलेला मार्जिन असे केले जाते. जर टि /१ वरील मार्जिन एफ आय आय/म्युच्युअल फंडांच्या मंजुरी मिळालेल्या सुरक्षा ठेवींच्या स्वरुपात असल्यास, सी एम ई चे गणन परिनिर्धारण रकमेच्या ५० वजा दिला गेलेला मार्जिन अधिक मार्जिनच्या भरपाईसाठी असलेल्या सुरक्षा ठेवींवर एक्सचेंजमार्फत दिलेला हेयरकट असे केले जाते.*

*६. आय पी सीला १००च्या क्रेडिट कॉन्वरजेशन घटका सोबतची (सी सी एफ) आर्थिक हमी अशा स्वरुपात वागणुक मिळते. परंतु, भांडवल केवळ अशा प्रदर्शनावर राखले जाते, ज्याचे गणन सी एम ई असे केले जाते, कारण उरलेले प्रदर्शन रोख रक्कम/सुरक्षा ठेवींनी आच्छादले जाते, ज्या बेसेल प्रमाणे असलेल्या ग्राह्य जोखीम कमी करणा-या असतात. अशाप्रकारे सी एम ई साठी घेतलेल्या रकमेवर भांडवलाचा प्रतिपाळ केला जातो आणि त्यावरील जोखमीचे महत्व १२५ %असते.*

### *२.३.३ <u>बँकांच्या भांडवल बाजारातील विगोपनाला मर्यादा</u>*

*२.३.३.१ <u>कंपन्यांमध्ये भाग भांडवल धारण करण्याला मर्यादा</u>*

*बँकिंग नियंत्रण कायदा १९४९ च्या कलम १९(२) नुसार कोणतीही बँकिंग कंपनी मालक म्हणून किंवा गहाण घेतलेले म्हणून, तारण घेतलेले म्हणून, बँकेच्या पेडअप भांडवल अधिक गंगाजळीच्या ३०% किंवा त्या कंपनीच्या भांडवलाच्या ३०% (यापैकी जे कमी असेल ते) यापेक्षा जास्त असता कामा नये. मात्र कलम १९(१) मधील प्रावधान याला अपवाद असतील. डीमॅट स्वरूपात समभाग ही या मर्यादेत धरले जातील. ही प्रत्येक कंपनीची एकूण मर्यादा आहे. समभागावर कर्ज देताना, समभागाचा इशू अंडरराईट करताना किंवा कर्जाऐवजी कंपनीचे शेअर घेताना किंवा गुंतवणूक म्हणून शेअर घेताना या प्रावधानांचे काटेकोर पालन झाले पाहिजे.*

*२.३.३.२ <u>नियंत्रक मर्यादा</u>*

*ए)एकल आधारावर*

*कोणत्याही बँकेचे भांडवली बाजारातील सर्व प्रकारचे विगोपन (फंड आधारावर असेलेले व नसलेले) हे परिच्छेद २.३.३ मध्ये दिल्याप्रमाणे निव्वळ मूल्याच्या (नेट वर्थ) ४०% पेक्षा जास्त असता कामा नये. या सर्वकष मर्यादेमध्ये बँकांची समभाग, परवर्तनिय कर्ज रोखे, परिवर्तनिय रोखे व समभागाकडे कल असलेल्या म्युच्युअल फंडांची युनिटस यातील थेट गुंतवणुक व व्हेंचर कॅपिटल फंडस् (नोंदणीकृत असलेले व नसलेले) मधील सर्व विगोपन हे निव्वळ मूल्याच्या २०% च्या पेक्षा जास्त असता कामा नये.*

*ब)एकत्रित आधारावर*

*एकत्रित झालेल्या बँकेचे बँकेचे भांडवल बाजाराचे (फंड आधारित असेलेले व नसलेले) एकूण विगोपन आउल्या वर्षीच्या ३१ मार्चच्या दिवशीच्या एकत्रित निव्वळ मूल्याच्या ४०% पेक्षा जास्त असू नये. या सर्वकष मर्यादेमध्ये बँकांची समभाग, परिवर्तनीय रोखे व कर्ज*

*रोखे, समभागाकडे कल असलेल्या म्युच्युअल फंडांची युनिटस यांचातील एकूण थेट विगोपन व्हेंचर कॅपिटल फंड (नोंदणीकृत असलेले व नसलेले) यांच्याबाबतीतील सर्व विगोपन हे एकत्रित निव्वळ मूल्याच्या २० पेक्षा जास्त असू नये.*

*<u>नोट :</u> समूहाबाबतीत सारासार दंडक लागू होण्यासाठी 'एकत्रित बँक' म्हणजे संस्थांचा समूह ज्यात परवानाधारक बँकेचा समावेश होतो व त्याला उपकंपन्या असतील किंवा नसतील.*

*२.३.३.३ परिच्छेद 'अ' आणि 'ब' मध्ये दिलेल्या मर्यादा या जास्तीत जास्त मर्यादा आहे व बँका यापेक्षा कमी मर्यादा स्वीकारू शकतात. त्यासाठी त्यांनी एकूण जोखीम व फायदा ध्यानात घ्यावा. बँकांनी या मर्यादा सतत पाळाव्यात.*

***निव्वळ किंमत (नेट वर्थ) ची व्याख्या***

*२-३-३*

*निव्वळ मूल्य म्हणजे भरणा झालेले भाग भांडवल अधिक मुक्त गंगाजळी अधिक समभाग अधिमूल्य (परंतु त्यात पुर्नमूल्य गंगाजळीचा समावेश नाही.) अधिक गुंतवणूक बदल गंगाजळी व नफा तोटा खात्यातील अधिक रक्कम उणे नफा-तोटा खात्यातील उणे रक्कम, साचलेला तोटा व न मोजता येणारी मालमत्ता कोणतीही सामान्य किंवा खास तरतूद निव्वळ मूल्यात धरू नये. ताळेबंदाच्या तारखेनंतर देशांतर्गत किंवा परदेशी इशू मधून समभागाद्वारे नवीन भांडवल आणल्यास ते ही भांडवल बाजारातील मर्यादा ठरवण्यासाठी धरावी. वरील गोष्टी धरण्याआधी बँकांनी बाहेरच्या लेखापरिक्षचचे भांडवलपूर्ती बाबतचे प्रमाण पत्र रिझर्व बँक ( बँकिंग पर्यवेक्षण विभाग) यांना द्यावे.*

***२.३.५ <u>भांडवल बाजार विगोपनामधून वगळलेल्या गोष्टी</u>***

*एकूण विगोपनची निव्वळ मूल्याची ४०% ची मर्यादा व थेट गुंतवणूकीच्या निव्वळ मूल्याची २०% ची मर्यादा यांचा हिशेब करताना खालील गोष्टी वगळल्या जातील (जिथे लागू असेल तिथे)*

*१) बँकेच्या स्वतःच्या उपकंपनीमधील सहकंपन्या जॉईंट व्हेंचर्स, प्रायोजित विभागीय ग्रामीण बँका यांच्यातील गुंतवणूकी तसेच महत्वाचा आर्थिक पायाभूत सुविधा असणा-या खालील संस्थांच्या समभागात, परिवर्तनीय रोखे व परिवर्तनीय कर्जरोख्यामधील गुंतवणूकी या संस्था अशाः- नॅशनल सिक्युरिटीज् डिपॉएिटरी लि. (एन.एस.डी.एल) सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडीया) लि. (सीएसडील) नॅशनल सिक्युरिटी क्लिअरिंग कॉर्पोरेशन लि. (एन.एस.सी.सी.ए) नॅशनल स्टॉक एक्सचेज (एन.एस.ई) क्लिअरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (सी.सी.आय.एल.) क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्यूरो ऑफ इंडिया लि. (सी.आय.बी.आय.एल) व मान्यता प्राप्त क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनी, मल्टी कमॉडिटी एक्सचेंज लि. (एम.सी.एक्स) नॅशनल कमॉडिटी अॅड डेरिव्हेरिव्हज एक्सचेंज लि. (एन.सी.डी.इ.एक्स) नॅशनल मल्टी कमॉडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया लि. (एन.एम.सी.ई.आय.एल.) नॅशनल कोलॅटरल मॅनेजमेट सर्व्हीसेस (एन.सी.एम.एस.एल.) व सूची ३ मध्ये दिल्याप्रमाणे अखिल भारतीय वित्त संस्था सूचीमध्ये दाखल झाल्यावर त्यापूर्वीच्या मूळ गुंतवणूकी पेक्षा जास्त केलेली गुंतवणूक ही भांडवल बाजाराच्या विगोपनाचा एक भाग असेल.*

*२) इतर बँकांनी जारी केलेले स्तर १ व स्तर २ ची कर्जाची इन्स्ट्रलमेंटस्*

*३) इतर बँकांच्या ठेवीप्रमाणपत्र (सी.डी.एस.)मधील गुंतवणूक*

*४) प्राधान्य समभाग (प्रेफरन्स शेअर्स)*

*५) अपरिवर्तनीय रोखे व अपरिवर्तनीय कर्जरोखे*

*६) ज्या म्युच्युअल फंडाचे पैसे फक्त कर्जाच्या इन्स्ट्रमेंटस्मध्ये गुंतवले असतात अशा म्युच्युअल फंडांची युनिटस्*

*७) कंपनीच्या कर्जाच्या पुनर्रचनेच्या एक भाग म्हणून कर्जाचे/थकित व्याजाचे समभागात रूपांतर केल्यावर बँकेने धारण केलेले शेअर्स*

*८) भारतीय आयात निर्यात बँके (एक्झीम बँक) च्या पुनर्वित योजने खाली परदेशातील सहकंपन्या/पूर्णपणे मालकीच्या कंपन्यामध्ये समभाग घेण्यासाठी भारतीय प्रर्वतकांना मंजूर केलेले मुदत कर्ज*

*९) १६ एप्रिल २००८ पासून बँका स्वतःच्या व त्यांच्या उपकंपन्यांच्या अंडररायटिंग बांधिलकी बुक रनिंग प्रोसे द्वारे वगळू शकतात व त्या द्वारे एका बँकेंचे किंवा एकत्रित बँक समूहाचे भांडवल बाजार विगोपन काढू शकतात (या परिस्थितीचा पुढे पुनर्विचार केला जाईल)*

१०) पायाभूत सुविधांसाठी कर्ज देण्यासाठी पायाभूत प्रकल्पासाठी निर्माण केलेली खास कंपनी (स्पेशल पर्पज व्हेईकल) चे प्रवर्तकांचे समभाग.

## २.३.६ विगोपनाचा हिशेब

भांडवल बाजारातील विगोपन काढण्यासाठी भांडवल बाजार व्यवहाराला मंजूर केलेले कर्ज/ उचल व हमी यांचा विचार हा मंजूर मर्यादा किंवा देय मर्यादा (आऊट स्टॅडींग) यातील जे जास्त असेल ते धरण्यात येईल. पण जे कर्ज पूर्ण काढले आहे त्याला मंजूर मर्यादेचा कोणताही भाग पुन्हा काढण्याचा प्रश्न येत नाही व त्यामुळे देय रक्कम देय विगोपन असे म्हणता येईल. बँकेची समभाग, परिवर्तनीय रोखे, परिवर्तनीय कर्जरोखे व समभागांकडे कल असलेल्या म्युच्युअल फंडातील युनिटसमध्ये केलेली भेट गुंतवणूक ही लागत किंमतीला (कॉस्ट प्राईस) धरण्यात येईल.

## २.३.७ दिवसामधील विगोपन

बँकेचे भांडवल बाजारातील दिवसांतर्गत विगोपना बाबत कोणतीही मार्गदर्शक तत्वे सध्या नाहीत हे धोकादायक आहे. प्रत्येक बँकेच्या निदेशक मंडळाने याबाबत दिवसांतर्गत विगोपनासाठी मर्यादा घालणारे धोरण घालून द्यावे व ते पाळले जात आहेत की नाही हे पहाण्यासाठी योग्य ती यंत्रणा घालून द्यावी. (परिस्थितीचा पुढे पुनर्विचार केला जाईल)

## २.३.८ मर्यादेत वाढ

ज्या बँकाकडे उत्तम अंतर्गत नियंत्रण व्यवस्था व उत्तम जोखीम व्यवस्थापन यंत्रणा आहे त्या रिझर्व बँकेला मर्यादा वाढवण्यासाठी योग्य त्या तपशीलासाठी अर्ज करू शकतात.

## २.४ समभागाला वित्त पुरवठा करणे व शेअर्समध्ये गुंतवणूक

### २.४.१ वैयक्तीक कर्जदारांना समभागावर कर्ज देणे

वैयक्तीक कर्जदारांनी समभाग, परिवर्तनीय कर्ज रोखे, परिवर्तनीय रोखे व समभागांकडे कल असलेले म्युच्युअल फंडस यावर ते कागदी स्वरूपात असल्यास १० लाखापेक्षा व डीमॅट स्वरूपात असल्यास २० लाख पेक्षा जास्त कर्ज देऊ नये. हे कर्ज खरोखरच्या वैयक्तिक गुंतवणूकदारांसाठी असेल व बँकेने एकाच कंपनीच्या किंवा अंतर्गत संपर्क असलेल्या वैयक्तिक गुंतवणूकदारांच्या समूहाला एकादा ठराविक समभाग इत्यादी घेण्यासाठी किंवा त्या फर्मच्या शेअर्स इत्यादीचा व्यवहाराला मदत करण्यासाठी असणार नाही. असे वित्तसहाय भांडवल बाजाराला विगोपन समजावे. बँकेने रिझर्व बँकेची मार्गदर्शक तत्वे ध्यानात घेऊन. वैयक्तिक कर्जदारांना समभाग, रोखे व कर्जरोखे यांच्यावर कर्ज देण्याचे धोरण आपल्या निदेशक मंडळाच्या संमतीने घालावे. सारासार विचार म्हणून अशा कर्जांना उपमर्यादाहि घालून द्यावात.

### २.४.२ पहिल्या सार्वजनिक इश्यूला (आयपीओ) वित्तसहाय्य करणे

बँका वैयक्तिक गुंतवणूकदारांना पहिल्या सार्वजनिक इश्यूमध्ये गुंतवणूक करण्यासाठी कर्ज देऊ शकते. वैयक्तिक कर्जदारांना समभाग, परिवर्तनीय कर्ज रोखे, परिवर्तनीय रोखे, समभागांकडे कल असलेले म्युच्युअल फंड यांच्या तारणावर कर्जाची जी १० लाख रूपयांची मर्यादा आहे तीच आयपीओ ला लागू होते. बँकांनी आयपीओ मध्ये गुंतवणूक करण्यासाठी कर्ज देण्यासाठी गैरबँकिंग वित्तीय कंपन्यांना वित्तसहाय्य देऊ नये. आयपीओ मध्ये गुंतवणूकीला दिलेले वित्तसहाय्य भांडवल बाजाराच्या विगोपनामध्ये धरल्या जातील.

### २.४.३. कंपन्यांच्या कर्मचा-यांना आपल्या कंपन्यांचे समभाग घेण्यासाठी बँकेचे वित्तसहाय्य

२.४.३.१ आपल्या कंपनीचे समभाग 'कर्मचारी समभाग पर्याय योजना (इएसओपी) या योजने खाली किंवा पहिल्या सार्वजनीक इश्यूमध्ये कर्मचा-यांसाठी ठेवलेल्या वाट्यामध्ये 'कर्मचा-यांना घेण्यासाठी बँका खरेदी किमतीचा ९०% किंवा २० लाख रूपये यामधील जे कमी असेल तेवढे वित्तसहाय्य देऊ शकते. अशा त-हेने केलेले वित्तसहाय्य बँकेच्या निव्वळ मूल्याच्या ४०% ची जी मर्यादा भांडवल बाजाराच्या विगोपनासाठी आहे, त्यात धरले जाईल. मात्र या सूचना बँकांना स्वतःच्या कर्मचा-यांना बँकेचे स्वतःचे सभाग इएसओपी/आयपीओ खाली घेण्यासाठी लागू होत नाहीत कारण बँकांना त्यांच्या कर्मचा-यांना या योजनाखाली किंवा या कारणासाठी दुय्यम बाजारातून समभाग खरेदी करण्यासाठी त्यांनी स्थापन केलेल्या ट्रस्टला कर्ज देण्याची बँकांना परवानगी नाही. ही कर्जे तारणासह असोत किंवा विनातारण असोत, हे बंधन लागू आहे.

२.४.३.२ वरील मर्यादांचे पालन करण्यासाठी, कर्जदाराने समभाग व इतर वर लिहिलेल्या प्रतिभूतीवर इतर बँकांकडून किती कर्ज घेतले आहे याची घोषणा करणारे पत्र घ्यावे.

२.४.३.३ फॉलोऑन सार्वजनिक प्रस्ताव(एफ पी ओज) देखील आय पी ओ मध्ये आंतर्भुत होतात.

*२.४.४ <u>शेअर दलाल व मार्केट मेकर्स यांना समभागावर कर्ज देणे</u>*

*२.४.४.१ बँकांना त्यांच्या निदेशक मंडळाने घालून दिलेल्या धोरणात्मक मर्यादेमध्ये त्यांच्या व्यापारी मूल्यामापनानुसार शेअर दलालांना व मार्केट मेकर्सना पतसुविधा द्यात्याला स्वातंत्र्य आहे. पण बँका व अंतर्गत संबंध असलेल्या शेअर दलाल कंपन्यांमध्ये काही संबंध जुळून येऊ नये म्हणून प्रत्येक बँकेच्या निदेशक मंडळाने त्यांच्या निव्वळ मूल्यांच्या ४०% च्या एकंदरीत मर्यादेमध्ये खालील कर्जांना उपमर्यादा घालून द्याव्यात.*

*१) सर्व शेअर दलाल व मार्केट मेकर्सना (फंडवर आधारीत असलेले व नसलेल म्हणजे हमी) आणि*

*२) कोणत्याही एका शेअर दलाल संस्थेला त्यांचे सहकंपन्या संबंधित कंपन्या धरून.*

*२.४.४.२ प्रतिभूती विनिमय केंद्रामध्ये शेअर बाजारातील खरेदी विक्रीसाठी शेअर दलालांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पत सुविधा देऊ नयेत.*

***२.४.५ समभागांच्या सहधारकांना किंवा तृतियपक्षी लाभार्थीसाठी वैयक्तिक कर्जदारांना समभागावर वित्तसहाय्य***

*जे समभाग सहनावात किंवा तृतियपक्षी लाभार्थीच्या नावे धारण केले आहेत त्यांच्यावर कर्ज देताना बँकांनी सावधानी बाळगावी की जेणे करून वरील व्यक्तींना कर्ज देऊन कर्ज मर्यादेचे उल्लंघन तर होत नाही.*

*२.४.६ <u>म्युच्युअल फंडाच्या युनिटवर कर्जे</u>*

*म्युच्युअल फंडांच्या युनिटवर कर्ज देताना बँकांनी खालील मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे.*

*१) ही युनिट्स प्रतीभूती विनिमय केंद्रात नोंदलेली असली पाहिजेत किंवा कर्ज देताना ही युनिट्स परत विकत घेण्याची सुविधा असली पाहिजे.*

*२) त्या योजनेतील युनिट्चा किमान कुलुपबंद काळ पूर्ण झाला असला पाहिजे.*

*३) कर्जाची रक्कम निव्वळ मालमत्ता किंमत/पुर्नखरेदी किंमत किंवा बाजारातील किंमत या पैकी जे कमी असेल ते याच्याशी जोडावी. त्याचा युनिटच्या दर्शनी किंमतीशी संबंध नाही.*

*४) म्युच्युअल फंडांच्या युनिट्सच्या वर कर्ज (पूर्णपणे कर्जाकडे कल असलेले म्युच्युअल फंड वगळून) या समभाग व कर्जरोख्यांवर देण्याच्या कर्जाला लागू असलेले संख्यात्मक व फरकात्मक (मार्जिन) आवश्यकता लागू रहातील. मात्र ज्या म्युच्युअल फंडांचा कल कर्जाकडे आहे त्यांच्या युनिटस वर कर्ज देताना किती रक्कम द्यायची व किती फरक (मार्जिन) ठेवायचा हे त्या त्या बँकेने त्यांच्या कर्ज धोरणानुसार ठरवावे.*

*५) गुंतवणूकदाराच्या गरजा लक्षात घेऊन त्यानुसार कर्ज धोरण ठरवावे. म्युच्युअल फंडाच्या इतर योजनेची विक्री वाढावी किंवा समभाग/रोखे/कर्ज रोखे खरेदी करता यावेत यासाठी कर्जे देऊ नयेत.*

*२.४.७ <u>समभाग/रोखे/कर्ज रोखे यांच्या तारणावर इतर कर्जदारांना कर्ज देणे.</u>*

*२.४.७.१ सर्वसाधारणपणे इतर कर्जदार कंपनी किंवा उद्योग संस्था यांना प्रवर्तकांच्या समभागासह इतर समभाग/रोख्यावर कर्ज देण्याचा प्रश्न येत नाही. परंतु असे समभाग/रोखे खेळत्या भांडवल कर्जाला किंवा उत्पादक कारणासाठी सहतारण म्हणून घेऊन गैर बँकिंग कंपन्या वगळून इतर कर्जदारांना कर्ज देता येता येईल. अशा परिस्थितीमध्ये बँकेने समभाग डिमटेरिअल स्वरूपात घ्यावेत. प्रवर्तकांचे समभाग ही डिमॅट स्वरूपात घ्यावेत.*

*२.४.७.२ गैर बँकिंग वित्तीय कंपन्या वगळून इतर कर्जदारांना नवा प्रकल्प उभारणे किंवा असलेल्या प्रकल्पाचा विस्तार करणे किंवा आहे त्या प्रकल्पासाठी खेळते भांडवल वाढवण्यासाठी कर्जदारांकडे फरक रकमेसाठी आवश्यक वित्त नसेल, अशा वेळी बँक समभाग व कर्ज रोखे फरकासाठी सहतारण म्हणून ठेवू शकते. ही व्यवस्था तात्पुरती असते व एक वर्षापेक्षा जास्त काळ चालू ठेवली जात नाही. ठरलेल्या काळात वित्त गोळा करून कर्ज फेड करण्याची कर्जदाराची क्षमता आहे काय हे बँकेने ठरवावे.*

*<u>२.४.८ प्रवर्तकांच्या भागासाठी बँकेने कर्ज देणे</u>*

*२.४.८.१ अशा त-हेचे कर्ज हे बँकांच्या एकूण विगोपनाच्या फंडवर आधारित असलेल्या व नसलेल्या भांडवल बाजारातील एकूण मर्यादे (आपल्या वर्षाच्या ३१ मार्चला बँकेच्या निव्वळ मूल्याच्या ४०% च्या आत) मध्ये धरले जाईल. हे कर्ज डिमॅट स्वरूपातील समभागांवर दिले जाईल.*

*२.४.८.२ या कर्जाना वैयत्तीक/सामूहिक कर्जदार विगोपन मर्यादा तसेच कंपन्यांच्या समभागावरील वैधानिक मर्यादा लागू होतील.*

*२.४.९ <u>ब्रिज लोन</u>*

*२.४.९.१ बँकांना अपेक्षित समभाग/इशूच्या येणा-या वित्तावर कंपन्यांना ब्रिज लोन मंजूर करण्याची परवानगी दिली आहे. अशी कर्जे बँकेच्या आदल्या वर्षीच्या निव्वळ मूल्याच्या ४०% ची जी मर्यादा घालून दिली आहे. (फंडवर आधारीत असलेली व नसलेली) त्यात समाविष्ट आहेत.*

*२.४.९.२ अशा त-हेची कर्जे मंजूर करताना त्यासाठी योग्य काळजी घेणे, तारणाकडे ध्यान देणे या गोष्टी लक्षात घेऊन बँकेने या कर्जाबाबत आपली मार्गदर्शक तत्वे ठरवून घ्यावीत.*

*२.४.९.३ बँका खालील अपेक्षित येणा-या वित्तावर ब्रिज लोन मंजूर करू शकतात, अपरिवर्तनीय कर्ज रोखे, बाहय व्यापारी कर्जे, जागतिक डिपाझिटरी रिसिट व थेट परकीय गुंतवणूक. मात्र कर्जदार कंपनीने वरील वित्त येण्याची नीट व्यवस्था केली आहे याची बँकेने खात्री करून घ्यावी.*

*२.४.१० <u>व्हेंचर कॅपिटल फंडमध्ये गुंतवणूक</u>*

*वार्षिक धोरण २००६-०७ मध्ये घोषित केल्याप्रमाणे तसेच आमचे परिपत्रक <u>डीबीओडी. बीपी. बीसी ८४ व २७/२१.०१.००२/२००५-०६</u> दिनांक मे २५, २००६ व ऑगस्ट २३, २००६ मध्ये दिल्याप्रमाणे व्हेंचर कॅपिटल फंड (नोंदणीकृत असलेले व नसलेले) हे समभागाबरोबरचे धरले जाईल व भांडवल बाजार विगोपन (प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष) साठी धरले जाईल.*

*२.४.११ <u>समभाग/हमी यांच्यावर फरक (मार्जिन)</u>*

*सर्व कर्ज/पहिला सार्वजनिक इशू/समभाग दलाल व मार्केट मेकर यांच्या तर्फे दिलेल्या हमीवर ५०% फरक (मार्जिन) ठेवले जाईल. हमी बाबत रोख किमान २५% फरक (वरील ५०% मधील) ठेवला जाईल. हे फरकाचे निर्बंध समभाग दलालीना तात्पुरते ओव्हर ड्राफ्ट किंवा डीव्हीपी व्यवहारासाठी वित्त पुरवठा करण्याला लागू होतील.*

*२.४.१२ <u>भारत सरकारचा निर्गुंतवणूक कार्यक्रम</u>*

*भारत सरकाने काही सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील आपल्या गुंतवणूकीचा काही भाग विकायचा कार्यक्रम आखल्यामुळे बँका यशस्वी दावेदारांना अशा सार्वजनिक क्षेत्राच्या उपक्रमांचे समभाग घेण्यासाठी कर्ज देऊ शकते. अशा कर्जामुळे जर कोणत्या बँकेचे आदल्या वर्षीच्या ३१ मार्चच्या निव्वळ मूल्याच्या ४०% मर्यादेचे उल्लंघन होत असेल तर या बाबतीत मर्यादा शिथील करण्याच्या विनंतीचा असा विचार केला जाईल की सार्वजनिक क्षेत्राचे उपक्रमाचे समभाग घेण्यासाठी केलेले वित्तसहाय्य वगळून बँकेचे उरलेले भांडवल बाजार विगोपन वैधानिक ४०% मर्यादेच्या आत येईल. तसेच प्रत्येक बाबीनुसार रिझर्व बँक वैयक्तिक/सामूहिक कर्जदारांच्या विनंतीचा विचार करील. मात्र त्यासाठी बँकेचे त्या कर्जदाराचे विगोपन (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाचे समभाग घेण्यासाठी केलेले विगोपन वगळून) हे वैयत्तीक/सामूहीक कर्जदारासाठी रिझर्व बँकेने ठरवून दिलेल्या सारासार विचार मर्यादेमध्ये असेल.*

*२.४.१३ अ) <u>परदेशी कंपन्यांचे समभाग घेण्यासाठी अर्थसहाय्य</u>*

*बँकेच्या कर्ज धोरणामध्ये नियामक मंडळाने मान्यता दिली असल्यास बँका भारतीय कंपन्यांना परदेशी सह कंपन्या/पूर्ण मालकीच्या परदेशी उप कंपन्या (नव्या किंवा आधीच अस्तित्वात असलेल्या) यांचे समभाग घेण्यासाठी वित्तसहाय्य करू शकते. अशा धोरणामध्ये अशा कर्जावर मर्यादा, कर्जदारांची पात्रता, कर्जाच्या अटी व शर्ती सुरक्षा तारण, फरक (मार्जिन) इत्यादी बद्दल तरतूद असावी. निदेशक मंडळ आपली मार्गदर्शक तत्वे व सुरक्षायंत्रणा ठरवू शकते पण अशी शेअर खरेदी देशाच्या व कंपनीच्या फायद्याची असावी. हया वित्त सहाय्याला बँकिंग नियंत्रण कायदा १९(२) मधील इतर वैधानिक तरतूदी लागू होतील.*

*<u>ब) भारतीय आयात निर्यात बँकेची पुर्नवित्त योजना</u>*

*वरील योजने खाली बँका पात्र अशा भारतीय प्रवर्तकांना परदेशी सहकंपन्या/पूर्णपणे मालकांच्या उपकंपन्या यातील समभाग खरेदीला वित्तसहाय करतीला मात्र अशी मुदत कर्जे भारतीय आयात निर्यात बँकेने मंजूर केली असली पाहिजे.*

*२.४.१४ <u>शेअर बाजारातील खरेदी विक्री व्यवहार</u>*

*बँकांनी स्वतः उपरोक्त व्यवहार करू नयेत किंवा शेअर दलालांना त्यासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पतसहाय्य देऊ नये. बँकांना दुय्यम बाजारातून समभाग खरेदी करायला मोकळीक आहे, पण त्यांच्या गुंतवणूक खात्यात समभाग प्रत्यक्ष नसताना विक्रीचा व्यवहार केला जात नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी.*

*२.४.१५ <u>मार्जिन ट्रेडिंग</u>*

*२.४.१५.१ बँक शेअर दलांलीना यासाठी वित्तसहाय्य करू शकतात. प्रत्येक बँकेच्या निदेशक मंडळाने याबाबतीला सविस्तर मार्गदर्शक तत्वे घालून द्यावीत त्यासाठीची तत्वे अशी*

*१) यासाठी दिलेले वित्तसहाय्य भांडवल बाजाराच्या विगोपनासाठी निव्वळ मूल्याच्या ४०% ची जी एकूण मर्यादा घालून दिली आहे त्यात येईल.*

*२) यासाठी दिलेलया वित्तसहाय्यासाठी किमान ५०% चा फरक (मार्जिन) ठेवावे लागेल.*

*३) यासाठी खरेदी केलेले समभाग डिमॅट स्वरूपात बँकेत गहाण ठेवलेले असावेत. बँकांनी ५०% फरक ठेवण्याची अट पाळली जाते की नाही ते नियमित पहाण्यासाठी एक यंत्रणा घालून द्यावी.*

*४) समभाग दलाल/संस्था व बँक यात काही 'हित संबंध' निर्माण होत नाहीत यासाठी आवश्यक त्या सुरक्षा योजना बँकेच्या निदेशक मंडळाने तयार कराव्यात. बँकेने मार्जिन ट्रेडिंगचा व्यवहार उचित अशा समभाग दलाल/संस्था यामध्ये वाटून द्यावा.*

*२.४.१५.२ मार्जिन ट्रेडिंग द्वारे झालेले बँकेचे विगोपनावर बँकेच्या लेखापरीक्षा समितीने देखरेख ठेवावी व बँकेने घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे पाळली जात आहेत यावर लक्ष द्यावे. मार्जिन ट्रेडींगसाठी दिलेले एकूण वित्तसहाय्य बँकेने ताळेबंदाच्या 'लेखा टिपणी' मध्ये नमूद करावे.*

*२.५ <u>जोखीम व्यवस्थापन व अंतर्गत नियंत्रण यंत्रणा</u>*

*वरील मर्यादेत ज्या बँका समभाग/रोखे यांच्यात गुंतवणूक करू इच्छितात, समभागासाठी वित्तसहाय्य, हमी देणे इत्यादी व्यवहार करू इच्छितात, त्यांनी खालील मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे.*

*२.५.१ <u>गुंतवणूक धोरण</u>*

*१) समभागात गुंतवणूक इत्यादीसाठी बँकेने पारदर्शक धोरण व पद्धती अवलंबावी व त्याला निदेशक मंडळाची अनुमती घ्यावी.*

*२) या व्यवहारावर अवलंबून, जेथे आवश्यक असेल तेथे समभाग संशोधन विभाग स्थापून त्यातील आवश्यक बँकांनी संपादन करावे.*

*२.५.२ <u>गुंतवणूक समिती</u>*

*या गुंतवणूकी संबंधीचा निर्णय बँकेच्या निदेशक मंडळाने या संबंधी स्थापन केलेल्या गुंतवणूक समिती ने घ्यावा व बँकेने केलेल्या सर्व गुंतवणूकीसाठी या समितीला जबाबदार धरावे.*

*२.५.३ <u>जोखीम व्यवस्थापन</u>*

*१) समभाग दलालांचे ग्राहक, अंतर्गत संबंध असलेले वैयक्तिक समभाग दलाल इत्यादी बाबतीत समभाग दलालांच्या बाबतीत बँकेचे विगोपन हे विस्तृत आहे याची बँकेने खात्री करून घ्यावी.*

*२) समभाग दलालाला कर्ज देताना बँकेने त्या दलालाची पतप्रतिष्ठा, त्याच्या कार्याचा इतिहास, त्याची आर्थिक स्थिती, त्यांनी स्वतः केलेले काम किंवा त्यांच्या ग्राहकांतर्फे केलेले काम, समभाग सरासरीची विक्री, व्यवसायात दलालाचे स्वतःचे किती पैसे गुंतले आहेत इत्यादी गोष्टींचा विचार करावा.*

*३) समभाग दलालांना कर्ज देण्याच्या प्रस्तावांचा विचार करताना बँकेने त्या दलालाने व त्यांच्याशी संबंधित कंपन्यांची इतर बँकांकडून कोणत्या सुविधा घेतल्या आहेत त्याचा तपशील घ्यावा.*

*४) इतर कर्जदारांना समभाग/रोखे यांच्यावर कर्ज देताना बँकेने त्यांनी/त्यांच्या सह कंपन्यांनी /त्यांच्याशी संबंधित कंपन्यांनी इतर बँकांकडून त्याच कारणासाठी काही पत सुविधा घेतल्या आहेत काय याचा तपशील घ्यावे. त्यामुळे कर्जदार किंवा त्यांच्या सहकंपन्या/संबंधित कंपन्या बँकेवर वित्तीयसहाय्यसाठी दबाब टाकू शकणार नाहीत.*

*२.५.४ <u>लेखापरीक्षा समिती</u>*

*१) समभागात गुंतवणूक/समभागावर कर्ज यावर देखरेख ठेवण्याचं काम लेखा परीक्षा समीती करेल. ही समीती प्रत्येक बैठकीमध्ये बँकेचे भांडवल बाजाराकडे एकूण विगोपन (फंडवर आधारीत असलेले व नसलेले) किती व कशा प्रकारचे आहे ते पाहील व या बाबत रिझर्व बँकेने जी मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत त्याचे पालन झाले आहे की नाही तसेच जोखीम व्यवस्थापन व अंतर्गत नियंत्रण व्यवस्था योग्य प्रकारे काम करत आहेत काय हे ठरवील.*

*२) ही लेखापरीक्षा समीती निदेशक मंडळाला एकूण भांडवल बाजारातील विगोपन, रिझर्व बँकेच्या व निदेशक मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांची पूर्तता, जोखीम व्यवस्थापन व अंतर्गत नियंत्रण यंत्रणा योग्य काम करत आहे काय याबाबत अहवाल देईल.*

*३) कोणत्याही त-हेच्या हितसंबंधाचा वाद उभा राहू नये यासाठी शेअर दलालीचा निदेशक मंडळाचे सदस्य म्हणून वा इतर कोणत्याही त-हेने गुंतवणूक समितीच्या कार्यात हस्तक्षेप होणार नाही व गुंतवणूकीच्या कोणत्याही*

*निर्णयाची वा समभागावर कर्ज देण्याच्या कोणत्याही निणर्याशी त्यांचा संबंध रहाणार नाही याची खात्री करून घ्यावी.*

**२.६ <u>मूल्यमापन व जाहीर करणे</u>**

*बँकेच्या पोर्टफोलिओ मधील समभाग मूळ तारण म्हणून सहतारण म्हणून किंवा हमीला तारण म्हणून किंवा गुंतवणूक म्हणून आले असेल तर त्याचे शक्यतो रोज बाजारात मार्किंग करावे पण निदान आठवडयातून एकदा तरी करावे. बँकांनी समभाग, परिवर्तनीय रोखे व कर्जरोखे तसेच समभागाकडे कल असलेल्या म्युच्युअल फंडाची युनिट्स यातील एकूण गुंतवणूक तसेच समभागावर दिलेली एकूण कर्जे आपल्या ताळेबंदात 'लेखापत्रकाच्या टीपा' यात नमूद करावीत.*

**२.७ <u>बँका/वित्तीय संस्थांनी एकमेकांच्या भांडवलात गुंतवणूक करणे</u>**

*२.७(१) बँका/वित्तीय संस्थांची इतर बँका/वित्तीय संस्थांच्या खालील इन्स्ट्रमेंटस् मधील गुंतवणूक ही गुंतवणूक करणा-या बँकेच्या भांडवली फंडाच्या (स्तर १ व स्तर २) १०% पेक्षा जास्त असता कामा नये.*

*अ) समभाग*

*(ब) प्राधान्य भाग (भांडवलाचा दर्जा असलेले)*

*क) सब ऑडिनेटेड डेबट इन्स्ट्रमेंस*

*(ड) हायब्रीड डेबट कॅपिटल इन्स्ट्रमेंटस् व*

*(इ) भांडवलाच्या दर्जाचे इतर कोणतेही इन्स्ट्रमेंट*

*२) जर बँका/वित्तीय संस्थांनी नव्याने खरेदी केलेल्या समभागाने ज्या बँकेचे वित्तीय संस्थाचे समभाग खरेदी केले आहेत त्याच्या समभागाच्या ५% पेक्षा जास्त समभाग नव्या खरेदीने होत असतील तर अशी खरेदी करू नये.*

*३) बँकेने/कोणत्याही कायद्याच्या अन्वये दुस-या बँकेचे समभाग धारण केले असेल तर ते वरील कायद्याच्या कक्षेत येत नाही.*

*२.७.२ बँकांनी/वित्तीय कंपन्यांनी त्यांच्या उपकंपनीमध्ये केलेल्या गुंतवणूकी सध्या स्तर १ भांडवलातून भांडवलपूर्ततेसाठी वजा केल्या जात आहेत. परिच्छेद २.७.१ (१) मध्ये दिलेले गुंतवणूक, जी स्तर १ भांडवलातून वजा केली जात नाही, तिला भांडवल पूर्ततेसाठी पत जोखमीचा हिशेब करताना १००% जोखीम वजा लावण्यात येईल.*

**२.८ <u>फरकाची आवश्यकता (मार्जिन)</u>**

**अ) <u>वस्तूंच्या बाजारात बँकेचे विगोपन</u>**

*प्रतिभूती विनीमय केंद्राच्या नियमानुसार मार्जिन ऐवजी बँका समभाग दलालांच्या बाजूने हमी देऊ शकतात. अशी हमी देण्याआधी बँकांनी किमान ५० फरक (मार्जिन) घ्यावे अशा त-हेने जारी केलेल्या हमी बाबत किमान २५% रोकड फरक (वरील ५०% च्या आत) ठेवावा. वरील नियम बँकांनी वस्तूंच्या दलालांच्या बाजूत राष्ट्रीय वस्तू विनिमय केंद्रांनाही त्यांच्या नियमानुसार लागू होईल जसे - नॅशनल कमोडिटी अँड डेरिव्हेरीव्ह एक्सचेंज (एनसीडीएक्स) मल्टी कमॉडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया लि. (एमसी एक्स) आणि नॅशनल मल्टी कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया लि.*

**ब) <u>करन्सी डेरिव्हेरिव्हज विभागाबाबत बँकेचे विगोपन</u>**

*या विभागाखाली येणा-या दलालाच्या विगोपनाच्या बाबतीत भांडवल बाजार विगोपनाचे नियम तसेच ५०% फरक ठेवण्याचे नियम व दिवसांतर्गगत देखरेख ठेवण्याचे नियम लागू होत नाहीत.*

**२.९ <u>तारण नसलेल्या हमी व तारण नसलेली कर्जे याबाबतच्या विगोपनाची मर्यादा</u>**

*२.९.१ याबाबत पूर्वी अशी सूचना होती की बँकांनी तारण नसलेल्या हमी बाबत आपली बांधिलकी अशी मर्यादित करावी की जेणे करून बँकेच्या देय विनातारण हमीच्या २०% अधिक एकूण विनातारण कर्ज (ॲडव्हान्स) हे एकूण कर्जाच्या (ॲडव्हान्स) १५% पेक्षा जास्त असता कामा नयेत. ही सूचना आता रद्द केली आहे व याबाबतीत बँकांना आपली धोरणे ठरवण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. त्याच प्रमाणे विनातारण विगोपनाचा हिशेब करताना दिलेल्या सर्व सवलती ही काढून घेण्यात आल्या आहेत.*

*२-९-२ नियमांचे सुसूत्रीकरण होण्यांच्या दृष्टीने 'विनातारण विगोपन' याचा अर्थ जेथे तारणाची येऊ शकणारी किंमत ही बँकेने/ बँकेच्या मान्य केलेल्या मूल्यमापनकारांनी/रिझर्व बँकेचा तपासणी अधिका-यांनी ठरवलेल्या मूल्याचा १०% पेक्षा अधिक नसेल. विगोपन म्हणजे फंडासह व फंडाविना विगोपन व त्यात*

*अंडररायटिंग व इतर तत्सम बांधीलकी येते. तारण म्हणजे मोजता येणासारखे तारण ज्यावर बँकेचा बोजा निर्माण केला आहे व त्यात हमी, कंर्फट लेटर इत्यादी न मोजता येणा-या तारणाचा समावेश होत नाही.*

*२-९-३ जाहिरीकरण केलेल्या ताळेबंदाच्या परिशिष्ठ क्र. ९ मध्ये प्रतिबींबीत होणा-या असुरक्षित अग्रिम राशींच्या निर्देशनासाठी बँकांमार्फत वित्तपुरवठा केल्या गेलेल्या प्रकल्पांच्या आनुशंधिक असलेल्या अधिकार, अनुज्ञापत्र, प्राधिकरण इ.च्या शुल्काचे गणन स्पष्ट मालमत्तेच्या स्वरुपात केले गेले पाहिजे. परंतु, बिल्ट ऑपरेट स्थानांतरण नमुन्याच्या (बी ओ टी)रस्ते/महामार्ग प्रकल्पांच्या संदर्भामध्ये , तसेच टोल संग्रह अधिकारांमध्ये बँका वार्षिक वृत्तीला आणि टोल गोळा करण्याच्या अधिकाराला कार्यदेशिर रित्या लागू करण्यायोग्य आणि अचल असणे आवश्यक आहे.*

## *२.१० <u>समभाग, रोखे यांच्या सावर्जनिक इशू साठी 'सुरक्षा जाळे' योजना</u>*

### *२.१०.१ <u>सुरक्षा जाळे योजना</u>*

*रिझर्व बँकेच्या असे लक्षात आले आहे की काही बँका/त्यांच्या उपकंपन्या त्यांच्या मर्चंट बँकिंगच्या कार्याखाली काही सार्वजनीक इशू बाबत 'सुरक्षा जाळे' या नावाखाली प्रतिभूती पुनः विकत घेण्याच्या सुविधा पुरवत आहेत या योजने अंतर्गत त्या प्रतिभूती इशू होताना ठरवलेल्या किंमतीला भविष्यात ठरवलेल्या काळात केंव्हाही मूळ गुंतवणूकदाराकडून विकत घेण्याची बांधीलकी स्वीकारून मोठया प्रमाणात विगोपन स्वीकारले जात आहे. मग त्यावेळी बाजारातील किंमत काहीही असो. काही बाबतीत अशा योजना ज्या कंपन्या इशू जारी करतात, त्यांनी विनंती न करताना बँकांनी आपण होऊन जाहीर केल्या आहेत. अशा बाबतीत या प्रतिभूती खरेदी करण्याची इशू करणा-यांकडून कोणतीच बांधीलकी स्वीकारली गेली नव्हती. या योजनेत कसलाही फायदा नव्हता. कारण ज्यावेळी बाजारातील किंमत पूर्वी ठरवलेल्या किमतीच्या खाली जाईल तेंव्हाच गुंतवणूक या योजनेचा फायदा घेईल, म्हणून या योजनेत तोटाच होता. त्यामुळे बँका/त्यांच्या उपकंपन्यांना असे आदेश दिले आहेत की त्यांनी कोणत्याही नावाखाली अशा 'सुरक्षा जाळे' योजना देऊ करू नयेत.*

### *२.१०.२ <u>पुन्हा खरेदी सुविधा देण्याचे प्रावधान</u>*

*काही बाबतीत इशू करणारे मूळ गुंतवणूकदारांना अपरिवर्तनीय कर्ज रोख्यांच्या बाबतीत एक वर्ष कुलुपबंद काल खंड सपल्यानंतर रू.४०,०००/- पर्यंत प्रतिभूती पुर्नखरेदी करण्याची सुविधा देतात. त्यामुळे गुंतवणूकदारांनी खरेदी केलेल्या रोख्यांना तरलता उपलब्ध होते. जर बँकांना किंवा त्यांच्या उपकंपन्यांना इशू करणा-यांच्या विनंतीनुसार असे वाटले की लहान गुंतवणूकदारांना नव्या इशूमध्ये गुंतवणूक करण्यासाठी अधिक सुविधांची आवश्यकता आहे तर अशा पुर्नखरेदी योजनामध्ये पूर्वी ठरवलेलया किमतीमध्येच प्रतिभूतीच्या बाजारातील किमती ध्यानात घेऊन किमती ठरवल्या पाहिजेत. या बाबतची बांधीलकी ही एकूण इशूच्या छोटया प्रमाणात असावी व बँका/त्यांचा उपकंपन्यांच्या एकूण स्वतःच्या पैशाच्या (फंड्स) २०% पेक्षा जास्त असू नये हया बांधीलकी विगोपनाच्या एकंदरीत मर्यादेमध्ये (वेळोवेळी प्रकाशित केलेल्या) असावी.*

*सूची-१*

***पायाभूत सुविधांसाठी कर्ज देणे यांची व्याख्या व***
***पायाभूत सुविधामध्ये येणा-या गोष्टी***
***(परिच्छद २.१.१.२)***

*कर्ज देणा-यांनी ( बँका, वित्तीय संस्था व गैर बँकिंग वित्तीय संस्था) यांनी कोणत्याही नावाने खाली दिलेल्या कोणत्याही पायाभूत सुविधेसाठी कोणतीही पतसुविधा ही 'पायाभूत सुविधा कर्ज देणे' या मध्ये येते. दुस-या शब्दात जी कर्जदार कंपनी खालील क्षेत्रातील किंवा तत्सम क्षेत्रातील कोणतीही पायाभूत सुविधा पुरवण्यामध्ये विकास करणे, चालवणे व देखभाल करणे यामध्ये कार्यरत असेल.*

*१) रस्ता - यात टोल रस्ता, पूल व रेल्वे यंत्रणा सामील आहे.*
*२) महामार्ग प्रकल्प यात सामील होणा-या सर्व गोष्ट*
*३) बंदर, विमानतळ देशांतर्गत बंदर व जल वहातूक*
*४) पाणीपुरवठा योजना, जल सिंचन योजना, पाणी स्वच्छ करण्याची योजना. मलनिस्सारण व स्वच्छता योजना किंवा घनकचरा व्यवस्थापन योजना*
*५) मूळ त-हेच्या (लँडलाईन) किंवा मोबाईल, दूरध्वनी सेवा यात रेडिओ पेजिंग, देशांतर्गत उपग्रह सेवा (दूरसंचार सेवा पुरवण्यासाठी भारतीय कंपनीच्या मालकीचा व तिने चालवलेला उपग्रह) ट्रंकिंग नेटवर्ग, ब्रॉड बॅड नेटवार्क व इंटरनेट सेवा*
*६) औद्योगिक पार्क किंवा विशेष आर्थिक विभाग*
*७) वीज निर्मिती किंवा वीज निर्मिती व वितरण*
*८) विजेचे वहन व वितरण व त्यासाठी आवश्यक वाहिन्यांचे जाळे निर्माण करणे*
*९) कृषी प्रक्रिया करू शकणारे प्रकल्प उभारणे व कृषी क्षेत्राला इनपुट्स देणे*
*१०) कृषी उत्पादन व नाशवंत वस्तू जसे फळे, भाज्या व फुले यांचे संरक्षण व ठेवण्याची सुविधा निर्माण करण्यासाठी बांधकाम*
*११) शैक्षणीक संस्था व इस्पितळे बांधणे*
*१२) गॅस, खनीज तेल व पेट्रोलियम पाईप लाईन टाकणे व त्याची देखभाल करणे*
*१३) अशा त-हेची कोणतीही पायाभूत सुविधा*

*सूची-२*

***अखिल भारतीय वित्तीय संस्थांची यादी***

***(काउंटर पार्टी विगोपन - कंपन्यांच्या रोख्यांना हमी देणा-या संस्थांची यादी) परिच्छेद २.१.३.४ (क)***

*१) इंडस्ट्रीयल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.*
*२) इंडस्ट्रीयल इनव्हेस्टमेंट बॅंक ऑफ इंडिया लि.*
*३) टूरिझम फायनान्स कॉपोरेशन ऑफ इंडिया लि.*
*४) रिस्क कॅपिटल ॲड टेक्नॉलोजी फायनान्स कॉरपोरेशन लि.*
*५) टेक्नॉलॉजी डेव्हलमेंट इन्फॉरमेशन कंपनी ऑफ इंडिया लि.*
*६) पॉवर फायनान्स कॉरपोरेशन लि.*
*७) नॅशनल हाऊसिंग बॅंक*
*८) स्मॉल इंडस्ट्रील डेव्हलपमेंट बॅंक ऑफ इंडिया*
*९) रूरल इलेक्ट्रीफिकेशन कॉरपोरेशन लि*
*१०) इंडियन रेल्वे फायनान्स कॉरपोरेशन लि*
*११) नॅशनल बॅंक फॉर ॲग्रीकल्चर ॲड रूरल डेव्हलमेंटस*
*१२) एक्सपोर्ट इंपोर्ट बॅंक ऑफ इंडिया*
*१३) इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलमेंट फायनान्स कंपनी लि*
*१४) हाउसिंग ॲड अर्बन डेव्हलमेंट कॉरपोरेशन लि.*
*१५) इंडियन रिन्यूएबल एनर्जी डेव्हलमेंट एजन्सी लि*

*सूची-३*

*अखिल भारतीय वित्तीय कंपन्यांची सूची (समभाग/परिवर्तनीय रोखे/कर्जरोखे यांच्यात बँके द्वारे गुंतवणूक)*

*ज्या वित्तीय कंपन्यांच्या इन्स्ट्रमेंट्स भांडवल बाजाराच्या विगोपन मर्यादेतून सूट आहे अशा वित्तीय कंपन्यांची यादी (परिच्छेद २.३.५ (१)*

*१) इंडस्ट्रीयल फायनान्स कॉरपोरेशन ऑफ इंडिया (आयएफसीआय)*
*२) टूरीझम फायनान्स कारपोरेशन ऑफ इंडिया लि (टीएफसीआय)*
*३) रिस्क कॅपीटल ॲड टेक्नॉलॉजी फायनान्स कार्पोरेशन लि (आर.सी.टी.सी)*
*४) टेक्नॉलीजी डेव्हलमेंट ॲड इन्फॉमेशन कंपनी ऑफ इंडिया लि (टीडीआयसीआय)*
*५) नॅशनल हाऊसिंग बँकिंग (एनएचबी)*
*६) स्मॉल इंडस्ट्रीजस डेव्हलमेंट बँक ऑफ इंडिया (एसआयडीबीआय)*
*७) नॅशनल बँक फॉर ॲग्रीकल्चर ॲड रूरल डेव्हलपमेंट (नाबार्ड)*
*८) एक्सपोर्ट इंपोर्ट बँक ऑफ इंडिया (एक्झिम बँक)*
*९) इंडस्ट्रियल इनव्हेस्टमेंट बँक ऑफ इंडिया (आयआयबीआय)*
*१०) लाईफ इन्शुअरन्स कार्पोरेशन ऑफ इंडीया (एलआयसी)*
*११) जनरल इन्शुअरन्स कार्पोरेशन ऑफ इंडिया (जीआयसी)*

सूची-४

## ह्या महापरिपत्रकात "एक्सपोजर नॉर्म्स" वरील एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी

| अनु क्र. | परिपत्रक क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १ | मेल बॉक्स क्लारिफ़िकेशन | २०.०६ २०११ | बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १८४९ च्या कलम २५ ची आयात – दि. जुलै १, २०१०च्या एक्सपोझर नॉर्म्सवरील सुधारित महापरिपत्रकाचा परिच्छेद २.२.३ (३) |
| २ | डीबीओडी.डीआयआर .बीसी.क्र. ९३/०८.१२.१४/२०१०-११ | १२.०५.२०११ | इमारती व पायाभूत सोयी बांधतांना आपत्ती रोधक असण्याची खात्री करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाबाबतची मार्गदर्शक तत्वे |
| ३ | ए.पी. (डीआयआर मालिका)परिपत्रक क्र. ५४ | २९.०४.२०११ | म्युच्युअल फंड ( एम एफ ) आणि विदेशी संख्यात्मक निवेदा ( एफ आय आय ) ह्यांच्या वतीने स्टॉक एक्सचेंजेसना इर्रिव्होकेबल पेमेंट कमिटमेंटस ( आयपीसी ) देणे |
| ४ | मेल बॉक्स क्लारिफ़िकेशन | १९.११.२०१० | भांडवली बाजाराबाबत बँकेचे एक्सपोझर – इर्रिव्होकेबल पेमेंट कमिटमेंटस देणे |
| ५ | डीबीओडी.डीआयआर .बीसी.५२/१३.०३.००/२०१०-११ | २८.१०.२०१० | भांडवली बाजाराबाबत बँकेचे एक्सपोझर – इर्रिव्होकेबल पेमेंट कमिटमेंटस देणे |
| ६ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.४८/२१.०६.००१/२०१०-११ | ०१.१०.२०१० | बँकाच्या ताळेबंदाबाहेरील एक्सपोझर्ससाठी जुडेंशियल नॉर्म्स - काउंटरपार्टी क्रेडिट एक्सपोझर्सचे बायलॅटरट नोटिंग |
| ७ | डीबीओडी.डीआयआर .बीसी.४६/१३.०३.००/२०१०-११ | ३०.०९.२०१० | भांडवली बाजाराबाबत बँकेचे एक्सपोझर – इर्रिव्होकेबल पेमेंट कमिटमेंटस देणे |
| ८ | डीबीओडी. डीआयआर . बीसी ४१/१३.०३.००/२०१०-११ | २१.०९.२०१० | सीएमईमधून वगळलेल्या बाबी |
| ९ | डीबीओडी.डीआयआर .बीसी.३२/१३.०३.००/२०१०-११ | ३०.०७.२०१० | भांडवली बाजाराबाबत बँकेचे एक्सपोझर – बँकांनी म्युच्युअल फंडांना दिलेली कर्जे व इर्रिव्होकेबल पेमेंट कमिटमेंटस ( आयपीसी ) देणे |
| १० | डीबीओडी. डीआयआर .बीसी.११६/१३.०३.००/२००९-१० | ३०.०६.२०१० | पायाभूत सोयी क्षेत्राला दिलेल्या अग्रिम राशींवरील प्रुडेंशियल नॉर्म्स |
| ११ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.९६/०८.१२.०१४/२००९-१० | २३.०४.२०१० | भांडवली बाजाराबाबत बँकेचे एक्सपोझर – बँकांनी म्युच्युअल फंडांना दिलेली कर्जे व इर्रिव्होकेबल पेमेंट कमिटमेंटस ( आयपीसी ) देणे |
| १२ | मेल बॉक्स क्लारिफ़िकेशन | ०९.०४.२०१० | पायाभूत सोयी क्षेत्राला द्यावयाच्या कर्जाची व्याख्या |
| १३ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.७४/२१.०४.१७२/२००९-१० | १२.०२.२०१० | "इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कंपन्या"म्हणून वर्गीकृत झालेल्या एनसीएफसीबाबत बँकाच्या एक्सपोझर संबंधाने जोखीम भार व एक्सपोझर नॉर्म्स |
| १४ | डीबीओडी.डीआयआर .बीसी.६६/१३.०३.००/२००९-१० | २३.१२.२००९ | भांडवली बाजाराबाबत बँकेचे एक्सपोझर – बँकांनी म्युच्युअल फंडांना दिलेली कर्जे व इर्रिव्होकेबल पेमेंट कमिटमेंटस ( आयपीसी ) देणे |
| १५ | मेल बॉक्स क्लारिफ़िकेशन दिनांक | ९.११.२००९ | नूतनीकरण करण्याजोग्या अर्जा /- आधारित अर्जा /बँकांना येणारी जोखीम |
| १६ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१३९/१३.०३.००/२००८-०९ | २५.०६.२००९ | भांडवली बाजाराबाबत बँकेचे एक्सपोझर – बँकांनी म्युच्युअल फंडांना दिलेली कर्जे व इर्रिव्होकेबल |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पेमेंट कमिटमेंटस ( आयपीसी ) देणे |
| १७ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१२५/२१.०४.०४८/२००८-०९ | १७.०४.२००९ | प्रतिभूतित अग्रिम राशींवरील प्रुडेंशियल नॉर्म्स |
| १८ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.११९/१३.०३.००/२००८-०९ | ३०.०३.२००९ | भांडवली बाजाराबाबत बँकेचे एक्सपोझर – बँकांनी म्युच्युअल फंडांना दिलेली कर्जे व इर्रिव्होकेबल पेमेंट कमिटमेंटस ( आयपीसी ) देणे |
| १९ | डीबीओडी. क्र. डीआयआर .बीसी.९८/१३.०३.००/२००८-२००९ | १२.१२.२००८ | भांडवली बाजाराबाबत बँकेचे एक्सपोझर – बँकांनी म्युच्युअल फंडांना दिलेली कर्जे व इर्रिव्होकेबल पेमेंट कमिटमेंटस ( आयपीसी ) देणे |
| २० | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.९६/२१.०४.१०३/२००८-०९ | १०.१२.२००८ | ग्राहकांच्या अनहेजड विदेशी मुद्राबाबतचे एक्सपोझर – बँकांद्वारे देखरेख |
| २१ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.४१/१३.०३.००/२००८-०९ | १०.०९.२००८ | भांडवली बाजाराबाबत बँकेचे एक्सपोझर – बँकांनी म्युच्युअल फंडांना दिलेली कर्जे व इर्रिव्होकेबल पेमेंट कमिटमेंटस ( आयपीसी ) देणे |
| २२ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.३१/२१.०४.१५७/२००८-०९ | ०८.०८.२००८ | बँकांच्या ताळेबंदाबाहेरील एक्सपोझर्सवरील प्रुडेंशियल नॉर्म्स |
| २३ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.९२/१३.०३.००/२००७-०८ | ९.०६.२००८ | भांडवली बाजाराबाबत बँकेचे एक्सपोझर – बँकांनी म्युच्युअल फंडांना दिलेली कर्जे व इर्रिव्होकेबल पेमेंट कमिटमेंटस ( आयपीसी ) देणे |
| २४ | डीबीओडी. क्र. डीआयआर .बीसी.८७/१३.२७.००/२००७-०८ | २९.०५.२००८ | एक्सपोझर नॉर्म्स |
| २५ | डीबीओडी. क्र. डीआयआर .बीसी.५७/१३.०३.००/२००७-०८ | १४.१२.२००७ | भांडवली बाजाराबाबत बँकेचे एक्सपोझर – बँकांनी म्युच्युअल फंडांना दिलेली कर्जे व इर्रिव्होकेबल पेमेंट कमिटमेंटस ( आयपीसी ) देणे |
| २६ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.५२/२१.०४.०४८/२००७-०८ | ३०.११.२००७ | २६. बँका व वित्तीय संस्थांद्वारे पायाभूत सोयींसाठी अर्थसहाय्य – “इन्फ्रास्ट्रक्चर लोडिंग”ची व्याख्या |
| २७ | डीबीओडी.क्र.इब्ड.बीसी.९६/२३.३७.००१/२००६-०७ | १०.०५.२००७ | २००७-२००८ वर्षासाठी वार्षिक धोरण विवेचन – भारतीय कॉर्पोरेट संस्थांच्या विदेशातील स्टेपडाउन दुय्यम संस्थांना कर्ज सुविधा देणे |
| २८ | डीबीओडी. क्र. डीआयआर ..बीसी.५१/१३.०३.००/२००६-०७ | ०९.०१.२००७ | कमोडिटी मार्केट बाबत बँकांचे एक्सपोझर – मार्जिनच्या आवश्यकता |
| २९ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.४७/१३.०७.०५/२००६-०७ | १५.१२.२००६ | भांडवली बाजारा बाबत बँकांचे एक्सपोझर – नॉर्म्सचे पुनर्रघंटन |
| ३० | डीबीओडी.क्र.एफएसडी.बीसी.४६/२४.०१.०२८/२००६-०७ | १२.१२.२००६ | सिस्टमॅटिकली इंपॉर्टंट एनबीएफसींचे वित्तीय विनियमन व बँकांचा त्यांच्याशी संबंध |
| ३१ | डीबीओडी.क्र.इब्ड.बीसी.४१/२३.३७.००१/२००६-०७ | ६.११.२००६ | २००६-०७ सालच्या वार्षिक धोरण निवेदनाचा मुदतमध्य आढावा – भारतीय संयुक्त उद्योग ( नेव्ही )/संपूर्ण मालकीच्या दुय्यम संस्था ( डब्ल्यु ओ एस ) ह्यांना निधियुक्त असलेल्या व निधियुक्त नसलेल्या कर्ज सुविधा देणे – वाढविणे |
| ३२ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.३०/२१.०१.००२/२००६-०७ | २०.०९.२००६ | स्पेशल इकॉनॉमिक झोन्स ( एसई झेड ) स्थापन करणे/एसई झेडमधील /- मिळविणे ह्यासाठी संस्थांबाबत बँकांचे एक्सपोझर |
| ३३ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.२७/२१.०१.००२/२००६-०७ | २३.०८.२००६ | प्रुडेंशियल मार्गदर्शक तत्वे – व्हेंचर कॅपिटल फंडामध्ये ( व्हीसीएफ ) बँकांची गुंतवणुक |
| ३४ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१७११/०८.१२.१४/२००५-०६ | १२.०६.२००६ | कर्जदारी संस्थांसाठी आवश्यक असलेल्या नॅशनल बिल्डिंग कोड ( एनबीसी ) गुणविदोषांचे पालन |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.८४/२१.०१.००२/२००५-०६ | २५.०५.२००६ | २००६-०७ सालचे वार्षिक धोरण निवेदन – व्यापारी रियल इस्टेट व व्हेंचर कॅपिटल फंड ह्यावरील जोखीम भर |
| ३६ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.७३/२१.०३.०५४/२००५-०६ | २४.०३.२००६ | पतपत्रांखाली डिस्काउंट केलेली बिले – जोखीम भार व एक्सपोझर नॉर्म्स |
| ३७ | डीबीओडी क्र.बीपी.बीसी.६५/०८.१२..०१/२००५-०६ | १.०३.२००६ | रियल इस्टेट क्षेत्राबाबत बँकांचे एक्सपोझर |
| ३८ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.५१/१३.०७.०५/२००५-०६ | २७.१२.२००५ | बँकेचे स्वतःचे शेअर्स खरेदी करण्यासाठी कर्मचारी/कर्मचारी ट्रस्ट ह्यांना बँकेद्वारे अर्थसहाय्य करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे |
| ३९ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.९३/१३.०७.०५/२००४-०५ | ०७.०६.२००५ | विदेशी कंपन्यांमध्ये इक्विटी मिळविण्यासाठी अर्थ सहाय्य |
| ४० | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.६९/१३.०७.०५/२००४-०५ | ३१.०१.२००५ | डेट – ओरिएंटेड म्युच्युअल फंडांच्या युनिटसविरुद्ध अग्रिम राशी |
| ४१ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.६४/१३.०७.०५/२००४-०५ | २७.१२.२००४ | ४१. इक्विटी व शेअर्समधील गुंतवणुकीसाठी बँकेद्वारा अर्थसहाय्य |
| ४२ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.६३/१३.०७.०५/२००४-०५ | २४.१२.२००४ | कर्मचाऱ्यांना त्यांच्याच कंपनीचे शेअर्स विकत घेण्यासाठी बँकेद्वारा अर्थसहाय्य |
| ४३ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.३/२१.०१.००२/२००४-०५ | ०६.०७.२००४ | कॅपिटल / प्रुडेंशियल नॉर्म्स - बँका/वित्तीय संस्थांमध्ये भांडवलाचे क्रॉस होल्डिंग |
| ४४ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१००/२१.०३.०५४/२००३-०४ | २१.०६.२००४ | २००४-०५ सालासाठी वार्षिक धोरण निवेदन – अधतिभूतित एक्सपोझर्सवरील प्रुडेंशियल मार्गदर्शक तत्वे. |
| ४५ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.९७/२१.०४.१४१/२००३-०४ | १७.०६.२००४ | २००४-०५ सालासाठी वार्षिक धोरण निवेदन – बँकाद्वारे प्रुडेंशियल कर्ज एक्सपोझर मर्यादा |
| ४६ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.९२/२१.०४.०४८/२००३-०४ | १६.०६.२००४ | २००४-०५ सालासाठी वार्षिक धोरण निवेदन – पायाभूत सोयीच्या अर्थसहाय्याबाबत मार्गदर्शक तत्वे |
| ४७ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.८६/१३.०७.०५/२००३-०४ | १८.०५.२००४ | इक्विटी व शेअर्समधील गुंतवणुकीसाठी बँकेद्वारा अर्थसहाय्य |
| ४८ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.६७/१३.०७.०५/२००३-०४ | ०६.०२.२००४ | कर्मचाऱ्यांना त्यांच्याच कंपनीचे शेअर्स विकत घेण्यासाठी बँकेद्वारा अर्थसहाय्य |
| ४९ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.६१/१३.०७.०५/२००३-०४ | ०३.०१.२००४ | इक्विटी व शेअर्समधील गुंतवणुकीसाठी बँकेद्वारा अर्थसहाय्य |
| ५० | डीबीओडी.बीपी.बीसी.५१/२१.०४.१०३/२००३-०४ | ५.१२.२००३ | २००३-०४ सालाच्या नाण्येविषयक व कर्ज धोरणाचा मुदतमध्य आढावा –कार्पोरेट संस्थांच्या अनहेज्ड विदेशी मुद्रा एक्सपोझर्स |
| ५१ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.९६/२१.०४.०४८/२००२-०३ | २३.०४.२००३ | सिक्युरिटायझेशन कंपन्या (एससी)/रिकन्स्ट्रक्शन कंपन्या (आरसी )(सिक्युरिटायझेड) अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनानशियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट आधिनियम, २००२ खाली निर्माण केलेल्या ) ह्यांना वित्तीय /- विकण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे व संबंधित प्रश्न |
| ५२ | डीबीओडी.क्र.इब्स.बीसी.९४/२३.३७.००१/२००२-०३ | ०८.०४.२००३ | भारतीय बँकाद्वारे, विदेशातील भारतीय संयुत्तच उद्योग ( जेव्ही )/संपूर्ण मालकीच्या दुय्यम संस्था (डब्ल्यु ओए) ह्यांना कर्जासह/कर्जाशिवाय सुविधा देणे आणि विदेशातील पक्षांना बांसर्स क्रेडिट व ॲक्सेप्टन्स फायनान्स देणे |
| ५३ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.७२/२१.०४.०१८/२००२-०३ | २५.०२.२००३ | एकत्रित पर्यवेक्षण करण्यास मदत होण्यासाठी, एकत्रित लेखा तयार करणे व इतर गुणात्मक रीती ह्याबाबतची मार्गदर्शक तत्वे |

| | | | |
|---|---|---|---|
| ५४ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.६७/२१.०४.०४८/२००२-०३ | ०४.०२.२००३ | पायाभूत सोयींना अर्थसहाय्याबाबत मार्गदर्शक तत्वे |
| ५५ | डीबीओडी.क्र.एफएससी.बीसी.६६/२४.०१.०२२/२००२-०३ | ३१.०१.२००३ | शेअर्स व डिबेंचर्सचा सार्वजनिक इश्यु – वाणिज्य बँकांच्या मर्चंट बँकिंग दुय्यम संस्थाद्वारे अंडररायटिंग |
| ५६ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.६३/१३.०७.०५/२००२-०३ | २९.०१.२००३ | इक्विटी व शेअर्समधील गुंतवणुकीसाठी बँकेद्वारा अर्थसहाय्य |
| ५७ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.४८/२१.०३.०५४/२००२-०३ | १३.१२.२००२ | डेरिवेटिव प्रॉडक्टच्या कर्ज जोखमींचे मापन |
| ५८ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१७/२१.०४.१३७/२००२-०३ | १६.०८.२००२ | भारत सरकारच्या पीएसयु निर्गुंतवणुकींसाठी बँकेच्या अर्थसहाय्याबाबत मार्गदर्शक तत्वे |
| ५९ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी. ६/१३.०७.०५/०२-०३ | २२.०७.२००२ | आखिल भारतीय वित्तीय संस्थांनी दिलेल्या इक्विटी/बाँडसमध्ये गुंतवणुक |
| ६० | डीबीओडी.बीपी.बीसी. २/२१.०१.००२/ ०२-०३ | ०५.०७.२००२ | महापरिपत्रक – कॅपिटल ॲडेक्वसीवरील प्रुडेंशियल नॉर्म्स |
| ६१ | आयईसीडी क्र.१६/०८.१२.०१/२००१-०२ | २०.०२.२००२ | पायाभूत सोयी – असलेल्यांना अर्थ सहाय्य देणे |
| ६२ | डीबीओडी.बीपी.बीसी.४७/२१.०३.५४/२००१-०२ | २२.११.२००१ | व्यत्तिगत/गट कर्जदारांबाबतच्या कर्ज जोखमीवरील मर्यादा |
| ६३ | डीबीओडी.बीपी.बीसी. ४५/२१.०४.१३७/०१-०२ | १५.११.२००१ | मार्जिन ट्रेडिंगसाठी बँकेद्वारा अर्थसहाय्य |
| ६४ | डीबीओडी.बीपी.बीसी.३७/२१.०४.१०३/२००१-०२ | २७.१०.२००१ | नाणेविषयक व कर्ज धोरणाबाबतचे उपाय – कार्पोरेट संस्थांच्या अनहेजड विदेशी मुद्रा एक्सपोझर्स |
| ६५ | डीबीओडी. बीपी.बीसी. २७/२१.०४.१३७/२००१ | २२.०९. २००१ | मार्जिन ट्रेडिंगसाठी बँकेद्वारा अर्थसहाय्य |
| ६६ | डीबीओडी क्र. बीपी.बीसी. ११९/२१.०४.१३७/२०००-०१ | ११.०५.२००१ | इक्विटी व शेअर्समधील गुंतवणुकीसाठी बँकेद्वारा अर्थसहाय्य |
| ६७ | डीबीओडी क्र. बीपी.बीसी.११६/२१.०४.०४८/२०००-०१ | ०२.०५.२००१ | नाणेविषयक व कर्ज धोरणाचे उपाय – २००१-२००२ |
| ६८ | डीबीओडी.बीपी.बीसी.५१/२१.०४.१३७/२०००-२००१ | १०.११.२००० | इक्विटी व शेअर्समधील गुंतवणुकीसाठी बँकेद्वारा अर्थसहाय्य |
| ६९ | डीबीओडी.क्र.बीपी.१५७७/२१.०३.०५४/२००० | २४.०१.२००० | प्रुडेंशियल क्रडिट एक्सपोझर मर्यादा |
| ७० | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१२१/२१.०४.१२४/ ९९ | ०३.११.१९९९ | नाणेविषयक व कर्ज धोरणाबाबत उपाय |
| ७१ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.३५/२१.०१.००२/९९ | २४.०४.१९९९ | नाणेविषयक व कर्ज धोरणाबाबत उपाय |
| ७२ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१३/१३.०७.०५/९९ | २३.०२.१९९९ | कॉर्पोरेट संस्थाचे शेअर्स व डिबेंचर्सच्या अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| ७३ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.२/१३.०७.०५/९९ | २९.०१.१९९९ | ब्रिज लोन्स |
| ७४ | डीबीओडी.क्र.इब्स.बीसी.१०४/२३.३७.००१/९८-९९ | १२.११.१९९८ | भारतीय बँकाद्वारे, विदेशातील भारतीय संयुत्तच उद्योग ( जेव्ही )/संपूर्ण मालकीच्या दुय्यम संस्था (डब्ल्यु ओए) ह्यांना कर्जासह/कर्जाशिवाय सुविधा देणे आणि विदेशातील पक्षांना बांसर्स क्रेडिट व ॲक्सेप्टन्स फायनान्स देणे |
| ७५ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१०३/२१.०१.००२/ ९८ | ३१.१०.१९९८ | नाणे विषयक व कर्ज धोरणाबाबत उपाय |

| | | | |
|---|---|---|---|
| ७६ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.९०/१३.०७.०५/९८ | २८.०८.१९९८ | शेअर्स व डिबेंचर्स विरुद्ध बँकेचे अर्थसहाय्य महापरिपत्रक |
| ७७ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.७८/१३.०७.०५/९८-९९ दिनांक | ०८.०८.१९९८ | कॉर्पोरेट संस्थाचे शेअर्स व डिबेंचर्सच्या अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| ७८ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.३६/१३.०३.००/९८ | २९.०४.१९९८ | नाणेविषयक व कर्ज धोरणाबाबत उपाय |
| ७९ | आयईसीडी.क्र.१३/०८.१२.०१/९७-९८ | २७.१०.१९९७ | बँकाद्वारे ब्रिजलोन सुविधा दिली जाणे |
| ८० | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१३८/१३.०७.०५/९७-९८ | २१.१०.१९९७ | ब्रिज लोन्स |
| ८१ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.९९/२१.०३.०५४/९७ दिनांक | ०२.०९.१९९७ | व्यत्तिगत/गट कर्जदारांबाबतच्या कर्ज जोखमीवरील मर्यादा |
| ८२ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.६०/१३.०७.०५/९७ | २८.०५.१९९७ | कॉर्पोरेट संस्थाचे शेअर्स व डिबेंचर्सच्या अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| ८३ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.४३/१३.०७.०५/९७ | १५.०४.१९९७ | शेअर्स विरुद्ध अग्रिम राशी |
| ८४ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.४२/१३.०७.०५/९७ | १५.०४.१९९७ | मुदत ठेवींच्या अतिभूतीविरुद्ध अग्रिम राशी |
| ८५ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१६१/२१.०३.०५४/९६ | १९.१२.१९९६ | मुदत ठेवींच्या अतिभूतीविरुद्ध अग्रिम राशी |
| ८६ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१४८/१३.०७.०५/९६ | १८.११.१९९६ | सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांनी दिलेल्या बाँडसमध्ये गुंतवणुक |
| ८७ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१४५/१३.०७.०५/९६ | २५.१०.१९९६ | कार्पोरेट संस्थाच्या शेअर्स व डिबेंचर्समध्ये गुंतवणुक |
| ८८ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१०९/२१.०३.०५३/९६ | ०९.०८.१९९६ | ठेवी प्रमाणपत्र ( सीडी ) योजना |
| ८९ | डीबीओडी.क्र.इब्स.बीसी.५४/२३.६१.००१/ ९६ | १८.०४.१९९६ | व्यक्तिगत/गट कर्जदारांबाबतच्या कर्ज जोखमीवरील मर्यादा |
| ९० | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१३/२१.०१.००२/९६ | ०८.०२.१९९६ | कॅपिटल ॲडेक्वसीबाबत उपाय |
| ९१ | डीबीओडी.क्र.एफएससी.बीसी.८६/२४.०१.००१/ ९५-९६ | १७.०८.१९९५ | अंडरराटिंग इत्यादि बाबत आश्वासने, दायित्वे |
| ९२ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.६९/१३.०७.०५/९५ | २८.०६.१९९५ | कॉर्पोरेट संस्थाचे शेअर्स व डिबेंचर्सच्या अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| ९३ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.३८/१३.०७.०५/९५ | ०४.०४.१९९५ | कॉर्पोरेट संस्थाचे शेअर्स व डिबेंचर्सच्या अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| ९४ | डीबीओडी.इब्स.बीसी.२९/२३.०६.००१/९५ | २०.०३.१९९५ | भारतीय व्यवसाय-उद्योगात विदेशी निधीचा वापर |
| ९५ | डीबीओडी.क्र.२८/१३.०७.०५/९५ | १०.०३.१९९५ | कॉर्पोरेट संस्थाचे शेअर्स व डिबेंचर्सच्या अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| ९६ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१/१३.०७.०५-९५ | ०६.०१.१९९५ | कर्मचाऱ्यांना त्यांच्याच कंपनीचे शेअर्स विकत घेण्यासाठी बँकेद्वारा अर्थसहाय्य |
| ९७ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१५१/१३.०७.०५/९४ | २८.१२.१९९४ | वैयक्तिक/गट कर्जदारांबाबतच्या कर्ज जोखमीवरील मर्यादा – / दिलेल्या अंडररायटींगमधील तसेच कमर्शियल पेपर्समधील गुंतवणुक बाँडसमधील त्यांच्या |
| ९८ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१३३/२१.०३.०५४/९४ | ११.११.१९९४ | वैयक्तिक/गट कर्जदारांबाबतच्या कर्ज जोखमीवरील मर्यादा – / दिलेल्या अंडररायटींगमधील तसेच |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कमर्शियल पेपर्समधील गुंतवणुक बॉंडसमधील त्यांच्या |
| ९९ | डीबीओडी.क्र.५२४/२३.६१.००१/९४-९५ | २५.१०.१९९४ | व्यक्तिगत/गट कर्जदारांबाबतच्या कर्ज जोखमीवरील मर्यादा |
| १०० | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१२४/१३.०७.०५/९४ | २२.१०.१९९४ | कॉर्पोरेट संस्थांचे शेअर्स व डिबेंचर्समधील व अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| १०१ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.९७/२१.०१.०२३/९४ | १९.०८.१९९४ | कॉर्पोरेट संस्थांचे शेअर्स व डिबेंचर्समधील व अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| १०२ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.६१/१३.०७.०५/९४ | १८.०५.१९९४ | कॉर्पोरेट संस्थांचे शेअर्स व डिबेंचर्समधील व अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| १०३ | डीबीओडी.क्र.इब्स.बीसी.५२/२३.०१.००१/९४ | ०४.०५.१९९४ | विदेशी उद्योगांमध्ये भारतीय गुंतवणुक - शक्यहीत भाग घेण्यासाठी अर्थसहाय्य |
| १०४ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.३६/२१.०३.०५४/ ९४ | ३०.०३.१९९४ | पीएसयुंनी दिलेल्या बॉंडसमधील व अंडररायटिंगमधील व कमर्शियल पेपर्समधील कर्जदारांबाबतच्या कर्ज जोखमीवरील मर्यादा गुंतवणुक – व्यक्तिगत/गट |
| १०५ | डीबीओडी.क्र.एफएससी.बीसी.१८/२४.०१.००१/ ९३-९४ | १९.०२.१९९४ | साधनसामुग्रीचे लीजिगं, हारार परचेस, फॅक्टरिंग इत्यादि कार्यकृती |
| १०६ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.४/१३.०७.०५-९४ | २५.०१.१९९४ | पीएसयुंनी दिलेल्या बॉंडसमधील व अंडररायटिंगमधील व कमर्शियल पेपर्समधील गुंतवणुक |
| १०७ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.३/१३.०७.०५-९४ | २४.०१.१९९४ | कॉर्पोरेट संस्थांचे शेअर्स व डिबेंचर्समधील व अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| १०८ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.२११/२१.०१.००१-९३ | २८.१२.१९९३ | विशिष्ट क्षेत्रांबाबतच्या कर्जांवरील निर्बंध – रियल इस्टेट कर्जे |
| १०९ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१७६/१३.०७.०५-९३ | ११.१०.१९९३ | विशिष्ट क्षेत्रांबाबतच्या कर्जांवरील निर्बंध – रियल इस्टेट कर्जे |
| ११० | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१४५/१३.०७.०५/९३ | ३०.०७.१९९३ | अंडररायटिंग कार्यकृती – अंडररायटर्सवरील विकास |
| १११ | डी.ओ.आयईसीडी.क्र.२/क्म्ड.गा/जन/९२-९३ | ०४.०७.१९९२ | गट दृष्टिकोन |
| ११२ | आयईसीडी.क्र.७/क्म्ड.गा/जन/९१-९२ | २९.०७.१९९१ | ग्रुप अकाउंटस |
| ११३ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.५१/सी.९६(स्ड/प्स्ब)-९० | २६.११.१९९० | कार्पोरेट शेअर्स व डिबेंचर्स व सार्वजनिक क्षेत्रातील बॉंडस धारण करणे |
| ११४ | आयईसीडी.क्र.इर्द.२४/इर-ए/९०-९१ | २३.११.१९९० | आजारी/दुर्बल एककांचे पुनर्वसन – विहित केलेल्या विद्यमान मर्यादा लागु एक्सपोझरला सूट करण्यापासून वैयक्तिक बॅंकेच्या |
| ११५ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.३५/सी.९६(झेड)-९० | २२.१०.१९९० | बॅंक हमी योजना |
| ११६ | डीबीओडी.क्र.एफएससी.बीसी.२७/सी.४६९-८९ | २९.०९.१९८९ | शेअर्स, डिबेंचर्स इत्यादींच्या सार्वजनिक इश्युसाठी “सेफ्टीनेट” |
| ११७ | डीबीओडी.क्र.एफएससी.बीसी.२६/सी.४६९-८९ | २९.०९.१९८९ | शेअर्स, डिबेंचर्स इत्यादींच्या सार्वजनिक इश्युबाबत जबाबदारी |
| ११८ | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१३२/६६-८९ | २६.०५.१९८९ | व्यक्तिगत/गट कर्जदारांबाबतच्या कर्ज जोखमीवरील मर्यादा |
| ११९ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१०३/सी.३४७(प्स्ब)-८९ | ०३.०४.१९८९ | कॉर्पोरेट संस्थांचे शेअर्स व डिबेंचर्समधील व अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| १२० | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.८५/सी.३४७(प्स्ब)-८९ | ०१.०३.१९८९ | कार्पोरेट शेअर्स व डिबेंचर्स व सार्वजनिक क्षेत्रातील बॉंडस धारण करणे |

| | | | |
|---|---|---|---|
| १२१ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१५३/सी.३४७(प्स्ब)-८८ | १८.०६.१९८८ | सार्वजनिक क्षेत्रातील बॉंडस धारण करण्यातील गुंतवणुक |
| १२२ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१०६/सी.९६(एसःडी)-८८ | १७.०३.१९८८ | कर्मचाऱ्यांना त्यांच्याच कंपनीचे शेअर्स विकत घेण्यासाठी बँकेद्वारा अर्थसहाय्य — मार्गदर्शक तत्वे |
| १२३ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.९१/सी.३४७(प्स्ब)-८८ | ०६.०२.१९८८ | कार्पोरेट शेअर्स व डिबेंचर्स व सार्वजनिक क्षेत्रातील बॉंडस धारण करणे |
| १२४ | डीबीओडी.क्र.इब्स.१३०/१३-८८ | २०.०१.१९८८ | विदेशातील, भारतीय संयुत्तच उद्योगांना अर्थ सहाय्य |
| १२५ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.२१/सी.३४७(प्स्ब)-८७ | ११.०८.१९८७ | शेअर्स, डिबेंचर्स व सार्वजनिक क्षेत्रातील बॉंडसमधील गुंतवणुक व अंडररायटिंग |
| १२६ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.६१/सी.३४७(प्स्ब)-८७ | ०९.०६.१९८७ | कॉर्पोरेट संस्थांचे शेअर्स व डिबेंचर्समधील व अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| १२७ | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.६०/सी.३४७(प्स्ब)-८७ | ०८.०६.१९८७ | कॉर्पोरेट संस्थांचे शेअर्स व डिबेंचर्समधील व अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| १२८ | डीबीओडी.क्र.ग्क.बीसी.५५/सी.४०८सी(पी)-८७ | २८.०५.१९८७ | पीएसयुंनी दिलेल्या बॉंडसमधील व अंडररायटिंगमधील व कमर्शियल पेपर्समधील गुंतवणुक |
| १२९ | डीबीओडी.क्र.ग्क.बीसी.१३१/सी.४०८सी(पी)-८६ | २५.११.१९८६ | कॉर्पोरेट संस्थांचे शेअर्स व डिबेंचर्समधील व अंडररायटिंगमधील गुंतवणुक |
| १३० | डीबीओडी.क्र.श.६८/सी.१०९-७२ | ३१.०७.१९७२ | बँक हमी योजना |
| १३१ | डीबीओडी.क्र.६६६/सी.९६/(झेड)-६७ दिनांक ३.५.१९६७ | ०३.०५.१९६७ | बँक हमी योजना |